RNI NO MAHMAR4234/13/1/2013 TC
वर्ष १ अंक पहिला मुंबई मे २०१३

# शब्द रुची

मूल्य १० रुपये




संजय कळमकर लिखित 'सारांश शून्य' या कादंबरीचे प्रकाशन करताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले. समवेत (डावीकडून) विठ्ठल कळमकर, जयवंत चुनेकर, सुदेश हिंगलासपूरकर, दिनकर टेमकर, लेखक संजय कळमकर, माजी खासदार यशवंतराव गडाख, जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष मोनिका राजळे, महेंद्र कदम, लहू कानडे, सभापती शिवाजी गाडे आदी.



'कवितेची वही' या कवितासंग्रहाच्या प्रकाशनासमयी डावीकडून 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, लेखिका शरयू घाडी, विजय खबाले–पाटील (जनसंपर्क अधिकारी), मनोज कोटक (शिक्षण समिती अध्यक्ष), कवयित्री सलोनी धुरी, सुनील प्रभू (मुंबई महापौर), सुनील धामणे (उपायुक्त शिक्षण), रवींद्र भिसे (शिक्षणाधिकारी), याकुब मेमन (नगरसेवक) आणि डॉ. जीवबा केळुसकर (उपशिक्षणाधिकारी)

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

मे २०१३, वर्ष १
अंक पहिला, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**शब्द रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

वाचक चळवळ म्हणून ग्रंथाली जनमानसात रुजली. गेल्या अडतीस वर्षांत विविध उपक्रमांद्वारे आपण भेटत आलो. महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्र हा सारा मराठी मुलुख ग्रंथालीशी जोडला गेला. जवळपास सातशे पुस्तकं प्रसिद्ध करताना, सर्वदूरचा लेखक या खुल्या व्यासपीठासमान चळवळीत सामील झाला. अनेकविध विषय ज्ञानाभिसरण करत आले. वाचकांची ज्ञानलालसा वाढीस लागणाऱ्या ग्रंथयात्रा घडल्या/घडत आहेत. यातून ग्रंथालीविषयी जनमानसात निर्माण झालेली 'रुची' आता 'शब्द रुची' या मासिकातून शब्दरूप घेऊन येत आहे. सामाजिक–सांस्कृतिक मूल्यं आणि नव्या–जुन्याचं भान राखणारे लेख यात असतील.

असा हा पहिला 'शब्द रुची' आपल्यासमोर मांडत आहोत. वर्दी आणि खादी हा नुकताच झालेला संघर्ष आपण पाहिला. साठ वर्षांच्या या राज्यात बदलत चाललेली मानसिकता अस्वस्थ करणारी आहे. अरुण पुराणिक यांनी एका सिनेमाच्या निमित्तानं यावर भाष्य केलं आहे. राजीव जोशी यांनी सांस्कृतिक वारसा पुढे नेणाऱ्या बुरगुंडाकार निरंजन भाकरे यांच्यावर लिहिलेला लेख या महाराष्ट्राचं परंपराभान दाखवतो. 'वॉटरगेट' हे अमेरिकन अध्यक्ष निक्सन यांच्यावर ओढवलेलं प्रकरण. त्यावर आलेला सिनेमा आणि पुढे त्यावर आलेली डॉक्युमेंटरी यावर अपर्णा पाटील प्रकाश टाकतात. भारतीय सिनेमाच्या शंभर वर्षांतील निवडक चित्रपटांद्वारे या चित्रसृष्टीचा प्रवास रविराज गंधे यांनी मांडला आहे. वसंत सरवटे यांच्यावरचा व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर यांचा लेख उद्बोधक आहे. डॉ. माधवी मेहेंदळे यांनी सुवर्णमंदिराला दिलेली भेट वाचावी अशी.

गेली तीन वर्षे ग्रंथाली प्रकाशनांचे संपादन अरुण जोशी करत आहेत. १ मेपासून 'शब्द रुची' मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून काम बघणार आहेत.

महाराष्ट्रदिनाच्या शुभेच्छा देताना, 'शब्द रुची'तून काळासोबत राहणारे साहित्य प्रसिद्ध होत राहील व आपणास ते भावेल असा विश्वास वाटतो.

**– सुदेश हिंगलासपूरकर**

## चित्रपट–वास्तव

# पण लक्षात कोण घेतो?

**अरुण पुराणिक**

१९५० साली गिरगावातील रॉक्सी थिएटरमध्ये बॉम्बे टॉकीजचा ‘संग्राम’ चित्रपट प्रदर्शित झाला. ‘लहानपणीच मातृसुखाला पारखा झालेला लहान मुलगा बापाच्या करड्या शिस्तीत वाढतो व मायेअभावी मोठेपणी अट्टल गुन्हेगार बनतो’ असे याचे कथासूत्र होते. बाप (नवाब) हा कर्तव्यकठोर, प्रामाणिक पोलिस अधिकारी असतो, तर बेटा (अशोककुमार) शहरातला खतरनाक गुंड!

या चित्रपटातील एका प्रसंगात, पोलिस नायकाला पकडण्यास येतात तेव्हा तो भररस्त्यात पोलिसांवर हल्ला चढवून त्यांना चांगले बदडून काढतो. साठ वर्षांपूर्वी, सार्वजनिक ठिकाणी पोलिसांवर असा हात टाकण्याचे धाडस, निर्दयी पठाण, निग्रो, बोटीवरचे गोरे खलाशीच काय, पण मिलिटरीचे जवानही करत नसत. जातीय दंग्यातही कधी पोलिसांवर हल्ला झाल्याचे ऐकू येत नसे. सर्वसामान्य जनता, पडद्यावर का होईना, पोलिसांना असा मार खाताना प्रथमच पाहत होती. थिएटरमध्ये हा प्रसंग पाहताना प्रेक्षक जागेवर उभे राहून शिझ्या फुंकत, टाळ्या वाजवत, आरडाओरड करत या प्रसंगाला दाद देत असत. असे काही घडेल याची सेन्सॉरलाही कल्पना नव्हती. त्यांनी डोळे झाकून चित्रपट संमत केला होता. या प्रसंगामुळे पोलिस खात्याची सर्वत्र बेअब्रू होऊ लागली होती. ‘संग्राम’ प्रदर्शित होऊन पंधरा आठवडे झाले होते. प्रत्येक खेळ हाऊसफुल जात होता. या प्रसंगाची सर्वत्र दबक्या आवाजात चर्चा होऊ लागली तेव्हा मात्र सरकार खडबडून जागे झाले. त्यावेळी मुख्यमंत्रीपदी मोरारजीभाई देसाई होते. कुणाचीही, कसलीही भीडभाड न ठेवणारा कर्तव्यकठोर प्रशासक असा त्यांचा लौकिक होता. त्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन ‘संग्राम’चे निर्माते, अभिनेते अशोककुमार यांना आपल्या कार्यालयात ताबडतोब बोलावून घेतले.

त्यांना सज्जड दम देत मोरारजी म्हणाले, ‘मिस्टर गांगुली, हा काय तमाशा चालवला आहे तुम्ही?’

‘सर! हा सिनेमा आहे. आम्ही प्रेमाचे, मारामारीचे फक्त नाटक करतो. प्रत्यक्षात आम्ही असे कधी करत नाही. सिनेमात डाकूची भूमिका करून कुणी डाकू होत नाही अन् वेश्येची भूमिका करून कुणी स्त्री वेश्या होत नाही. आम्ही सेन्सॉरची रीतसर परवानगी घेऊनच हा चित्रपट प्रदर्शित केला आहे. मला पोलिसांविषयी मनात नितांत आदर आहे.



त्यांची बदनामी करण्याचा आमचा हेतू नाही’ अशोककुमार गयावया करत समर्थन देऊ लागले. ‘हा पोरखेळ तुम्ही ताबडतोब बंद करा. मी महाराष्ट्र राज्याचा प्रमुख आहे. माझ्या पोलिसांची बेइज्जती मी कुठल्याही परिस्थितीत सहन करणार नाही. उद्यापासून ‘संग्राम’चे सर्व खेळ रद्द करा. ते सेन्सॉर वगैरे मला काही सांगू नका.’ असे ठणकावून मोरारजींनी एका रात्रीत ‘संग्राम’ला सर्व थिएटर्समधून गाशा गुंडाळायला लावला. यावर कसलीही चर्चा नाही की अपील नाही. फक्त कठोर निर्णय आणि त्याची विनाविलंब कार्यवाही!

गेल्या साठ वर्षांत अतिरंजित, भडक, विकृत चित्रण करून सिनेमावाल्यांनी या पोलिसांना जितके बदनाम केले आहे तितके कदाचित खतरनाक गुंड, भ्रष्ट राजकारणी आणि अतिरेक्यांनीही केले नसेल! पोलिस हा त्यांनी चेष्टेचा, टिंगलीचा विषय बनवून टाकला. प्रेम चोप्रा, आय.एस. जौहर, असरानी, दादा कोंडके, प्रेमनाथ आदी विनोदी अभिनेत्यांद्वारे तर त्यांची काही वेळा इज्जत काढली आहे. त्यांच्याविषयीची भीती, दरारा पार नष्ट करून टाकला आहे.

आमच्या लहानपणी, मूल जेवत नसेल, झोपत नसेल तर आया त्याला पोलिसांची भीती घालत. तेव्हा धाडसी हवालदार केवळ रबरी दंडुका आणि कमरेचा चामडी पट्टा या आयुधांनिशी अट्टल सुरेबाजास जेरबंद करत. ऐन दंगलीत कुठल्याही खतरनाक एरियात बिनधास्त घुसत. मध्यरात्री काठ्या आपटत, विजेरीचा प्रखर झोत फेकत सर्व शहरात गस्त

घालत. रस्त्यावर वायरलेसचा कर्कश सायरन वाजू लागल्यावर, बोक्याला पाहून उंदीर जसे बिळात लपतात तसे गुंड रस्त्यावरून नाहीसे होत. सांगली-सातारा, सिंधुदुर्गच्या निधड्या हवालदारांना निर्दयी पठाणही बिचकून असत. आणीबाणीच्या काळात, आर्थर रोड जेलमध्ये सावंत नावाचे हवालदार होते. भरदार गर्दन आणि तीक्ष्ण नजर! जेलमधील गुंड त्यांच्यासमोर थरथर कापायचे. सुकर नारायण बाखियाला गुजरातमधून तेच घेऊन आले होते.

त्यावेळचे मुंबईचे पोलिस आयुक्त गमतीने म्हणायचे, मुंबईतील सर्वात सुसंघटित सशस्त्र, पॉवरफुल गँग आहे ती आम्हा पोलिसांची! आमच्यानंतर मग काँग्रेस, सेना, इतर पक्ष, बाकी इतर सटरफटर गँग आहेत, पठाण आहेत, मराठी तरुण आहेत, पण आमच्या दृष्टीने त्या नगण्य आहेत. यातील गमतीचा भाग सोडला तरी त्यात बरेच तथ्य होते. पोलिसांचा समाजात वचक होता. जनतेच्या मनात त्यांच्याविषयी भीतियुक्त आदर होता. पोलिस हे गुन्हेगारांचे कर्दनकाळ होते, जनतेचे मित्र होते.

स्वातंत्र्य मिळाले. पुढच्या काळात मोरारजी देसाई मुख्यमंत्री झाले. त्यांनी दारूबंदी कायदा कडकपणे अमलात आणायला सुरुवात केली. हातभट्टीच्या दारूला व कायद्याच्या रक्षकांना सुगीचे दिवस आले. १९५२ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. मुंबईच्या अनेक भागांत कम्युनिस्टांचे प्राबल्य होते. सर्व कष्टकरी समाज त्यांच्या हातात होता. कम्युनिस्टांना शह देण्यासाठी मुंबई प्रदेश काँग्रेसने मुंबईतील प्रख्यात दादा लोकांना हाताशी धरले. पोलिसांनी त्यांना छुपा पाठिंबा दिला. राज्यकर्ते, पोलिस आणि गुंड यांच्या सहकार्याने मुंबईत दोन नंबरच्या प्रचंड उद्योगाची निर्मिती झाली. या दोन नंबरच्या धंद्यातून प्रचंड पैसा व सत्ता निर्माण झाली.

जवळजवळ १९७० पर्यंत मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष हा मुंबईचा अनभिषिक्त सम्राट होता. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर हे सत्ताकेंद्र पश्चिम महाराष्ट्राकडे सरकले. गृहखात्याचे महत्त्व जबरदस्त वाढले. पोलिसांच्या कार्यात राजकीय हस्तक्षेप वाढू लागला. मुंबईत संघटित गुन्हेगारीला सुरुवात झाली. दारूबंदी शिथिल करण्यात आली. मुंबईत सर्वत्र बिअरबार आणि बारबालांचा सुळसुळाट झाला.

पोलिस खात्यातील बदल्या-बढत्या राजकीय वरदहस्ताने होऊ लागल्या. महत्त्वाच्या पोस्टिंगसाठी रेट ठरवले गेले. राज्याच्या महासंचालकपदी वा पोलिस आयुक्तपदी कोण असावे हा निर्णय पक्ष कार्यालयात घेतला जाऊ लागला. पोलिस हे राजकारण्यांच्या हातातले बाहुले बनले. स्वच्छ चारित्र्याचे, कार्यक्षम अधिकारी या सिस्टिममध्ये भरडले गेले. त्यांचे मनोबल खच्ची होऊ लागले. राज्यकर्ते पोलिसांना आपल्या कामासाठी राबवू लागले. एक उदासीनता, मरगळ निर्माण झाली.

पोलिसांच्या या दुर्बल मनोबलाचा परिणाम गेल्या पंचवीस वर्षांत प्रकर्षाने दिसू लागला. सेशन कोर्टाचे आवार, भायखळ्याचे सात रस्ता लॉकअप, आर्थर रोड जेल, जे.जे. हॉस्पिटल यांसारख्या अत्यंत संवेदनशील ठिकाणी पोलिसांच्या डोळ्यांदेखत निर्घृण



खून पाडण्यात आले. १९९९ मध्ये मुंबईच्या गजबजलेल्या सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. त्यानंतर उसळलेल्या दंगलीत लोकांना जिवंत जाळण्यात आले. मुंबईवर भीषण दहशतवादी हल्ला झाला. शेकडो निरपराध नागरिक यात मारले गेले. संपूर्ण पोलिस खाते या मूठभर दहशतवाद्यां-समोर हतबल झाले. त्यांचा बिमोड करण्यासाठी शेवटी लष्कराला पाचारण करावे लागले. या सर्वात सुन्न करणारी, समाजविघातक घटना होती ती आजाद मैदानात उसळलेली पूर्वनियोजित दंगल. या दंगलीत कायदासुव्यवस्थेचे रक्षण करणाऱ्या पोलिस खात्यातील आया-बहिणींच्या इज्जतीवरच दंगलखोरांनी घाला घातला. शिवरायांच्या महाराष्ट्राच्या राजधानीत हा लाजीरवाणा प्रकार घडला आणि आता अलीकडेच विधानसभेच्या आवारातच जनतेच्या प्रतिनिधींनी एका पोलिस अधिकाऱ्यास मारहाण केली. कारण काय, तर त्या अधिकाऱ्याने उद्धट वर्तन केले. गेल्या शंभर वर्षात पोलिसखात्याची अशी लक्तरे कधी वेशीवर टांगली गेली नव्हती.


यात पोलिसांना पाठीशी घालून त्यांचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न नाही.

त्यांच्यातही अल्प प्रमाणात काही वाईट प्रवृत्ती आहेत, भ्रष्टाचार आहे. त्या प्रवृत्ती ठेचल्या गेल्याच पाहिजेत यात वाद नाही, पण म्हणून सरसकट त्यांचे खच्चीकरण करणे हा खचित त्यावरचा उपाय नाही. याच पोलिस खात्यात, जीवावर उदार होऊन कसाबसारख्या नराधमास एके-४७ सह जिवंत पकडणारे तुकाराम ओंबळेंसारखे धाडसी अधिकारी होते. मुंबईचे पदपथ साफ करून दाखवणारे वसंत ढोबळेंसारखे कठोर, कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत. मनात आणले तर महिनाभरात मुंबईतील सर्व गुन्हेगारी आटोक्यात आणता येऊ शकते, पण तशी राजकीय इच्छाशक्तीच नाही.

सैन्य, पोलिस, अग्निशमन दल ही समाजाच्या सुरक्षेची अभेद्य कवचे आहेत. ती जर विस्कळीत झाली तर सर्वांचेच जीणे कठीण होणार आहे. आज जनतेचे प्रतिनिधी म्हणून मिरवणारे लोकही पोलिस-संरक्षणाशिवाय बाहेर फिरू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सिनेमावाल्यांना पायरसी रोखण्यासाठी पोलिसांचीच मदत लागते. मग या बदल्यात ते सिनेमातून पोलिसांची चांगली प्रतिमा का निर्माण करू शकत नाहीत? ब्लॅक फ्रायडे किती सुंदर चित्रपट होता. पोलिसांविषयी जनतेच्या मनात भीती, आपुलकी आणि दरारा निर्माण झाल्याशिवाय समाजात कायदा आणि सुव्यवस्था नांदूच शकत नाही. वसंत ढोबळेंनी हे सप्रमाण दाखवून दिले आहे, पण मतांचे राजकारण करणाऱ्या लोकांच्या डोक्यात हे केव्हा आणि कसे जाणार? उद्या जर हे पोलिसच हतबल झाले तर त्यांना संरक्षण कोण पुरवणार?

पोलिसांची बेअब्रू खपवून न घेणारे मोरारजींसारखे मुख्यमंत्री एकीकडे आणि आमदारच पोलिस अधिकाऱ्याला मारहाण करतात व त्यातून वर्दी आणि खादी संघर्ष पेटतो हे आजचे वास्तव दुसरीकडे. आता नीरक्षीर करणारे सत्ताधीश नसण्यामागे समाज कुठे जातोय हेच दिसते.

**- अरुण पुराणिक**
इ-१०३, महेश्वरीनगर,
एमआयडीसी, अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०००९३
भ्रमणध्वनी : ९३२२२१८६५३
vgpuranik@gmail.com




## सारांश शून्य

### संजय कळमकर

मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.
टपाल खर्च ३० रु.

आपल्या भोवतीचं एकही क्षेत्र असं नाही की ज्यात आज भ्रष्टाचार अनुभवास येत नाही. या स्थितीचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे, तिनं माणसातलं माणूसपण, संवेदनशीलता, उपक्रमशीलता हे आणि असे सगळेच गुण गिळून टाकले आहेत आणि माणसाला अंतर्बाह्य हिडीस, ओंगळवाणं करून टाकलं आहे.

अशा परिस्थितीत, या सडलेल्या व्यवस्थेच्या विरोधात आजची तरुण पिढी निकरानं, अभिमन्यूच्या त्वेषानं लढू पाहते आहे.

या व्यवस्थेतच असणारे आणि सजगपणे परिस्थितीला सामोरं जाणारे तरुण लेखक संजय कळमकर हे त्यापैकी एक. त्यांनी शिक्षणक्षेत्रातली भ्रष्ट व्यवस्था थेटपणे, पण डोळसपणे; चिंतनशील वृत्तीनं अनुभवली आहे; याचं भान देणारी, नारायण जगदाळे या शिक्षकाची, व्यवस्थेत राहूनच तिच्या विरोधात लढण्याचा निश्चय करणाऱ्या तरुणाची ही कथा... चित्रदर्शी आणि प्रत्ययकारी...

## कवितेची वही

### सलोनी धुरी




मूल्य ८० रु.
सवलतीत ५० रु.
टपाल खर्च ३० रु.

'कवितेची वही' हा संग्रह हाती आला आणि वाळवंटातही एक गोड पाण्याचा झरा सापडावा असे मला वाटले. सलोनी जिथे राहते तेथील सामाजिक परिस्थिती, घरकाम करणारी आई अशी कौटुंबिक परिस्थिती म्हणजे वाळवंट. अशा वाळवंटात राहूनही सुंदर काव्य जिला स्फुरते ती सलोनी म्हणजे एक निर्झरच. महापालिकेच्या शाळेत सातवीत शिकणाऱ्या या बालकवयित्रीच्या प्रतिभेचे कौतुक वाटते.

**- सुनील प्रभू**
महापौर, मुंबई



प्रभाकर वाईरकर

## ओळख व्यंगचित्रकाराची

# वसंत सरवटे – एक प्रयोगशाळा

### व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर

‘त्या’ काळी ‘कलापूर’मध्ये कलेचा सूर्य कधी मावळलाच नाही... सृजनशील व्यक्तींच्या सृजनशीलतेला नवनवीन धुमारे फुटत होते... आबालाल रहिमान, बाबूराव पेंटर, बाबा गजबर इत्यादी कलाकार क्षणाक्षणाला रंगछटा बदलणाऱ्या शाली निसर्गावर पांघरत होते... पं. अल्लादियाँ खान यांच्या कंठातून फुटणाऱ्या तानेतून आसमंत थरारत होते... वि.स. खांडेकरांच्या ‘अमृतवेली’चा सुगंध वातावरणात दरवळत होता.. ना.सी. फडक्यांच्या ‘गुलाबी’ कथेच्या हिंदोळ्यावर तरुण-तरुणी सर्वांगसुखाचा आनंद घेत होते.. मास्टर विठ्ठलांसारखे नटरंगी आपल्या अभिनयाची तोरणे आकाशात बांधत होते (मा. विठ्ठलांनी कोणत्या फिल्मी स्टुडिओसाठी काम करावे यासाठी त्यांच्यावर कोर्टकेस झाली होती व त्यांचे वकील होते बॅ. जीना!)... अशा कलेने भारलेल्या वातावरणात कलापूर-कोल्हापूरमध्ये आगमन झाले ‘वसंताचे’... ज्येष्ठ-श्रेष्ठ व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांचे.

त्या परिसरातील हवेतच कलागुण असल्याने बाल वसंत चित्रकलेबरोबर खेळायला लागला. शाळेची हस्तलिखिते सजवू लागला. मध्यमवर्गीय कुटुंब, प्रशस्त वाडा... सध्याचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार शि.द. फडणीसांशी जीवाभावाची मैत्री. त्यांनाही चित्रकलेची असलेली ओढ. त्यामुळे वसंता त्यांच्याबरोबर स्केचिंगला जाण्यास सदैव तयार असे. त्या काळी कोल्हापूरमधील ‘करवीर नगर वाचन मंदिर’ या ग्रंथालयाचे अध्यक्ष ना.सी. फडके होते व ते नवनवीन इंग्रजी साप्ताहिके ग्रंथालयासाठी आणत. त्यामध्ये व्यंगचित्रे-चित्रांचा भरणा खूप असे. स्ट्रँड, सॅटर्डे इव्हनिंग पोस्ट, कॉलियर्स इत्यादी साप्ताहिके आणि अन्य मासिके पाहून वसंताची चित्रकलेसंबंधी भूक अधिकच वाढत गेली.

शाळेतील शिक्षक शिरगांवकर यांनी तर चित्रकलेची अनेक पुस्तके- इंग्रजी - विद्यार्थ्यांसमोर दाखवून त्यांच्यामध्ये चित्रकलेची ऊर्जा निर्माण केली. गणितामध्ये १०० टक्के मार्क असताना कोणते आईवडील त्याकाळी बेभरवशाच्या चित्रकलेचे शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देतील? झाले तसेच. वसंत सरवटे पुण्याला इंजिनीयरींग कॉलेजमध्ये रवाना झाले.

कॉलेजचे पहिले वर्ष झाल्यावर ते आजारी पडले व पुन्हा कोल्हापूरला आले, विश्रांतीसाठी. हाच काळ त्यांच्यातील चित्रकलेला मार्गदर्शक ठरला. ते नेहमी स्केचिंगला जात. रंकाळा, संध्यामठ, पन्हाळा या नेहमीच्या रुळलेल्या ठिकाणी न जाता, कोणी जात नाही अशा ठिकाणी ते जात. स्केचिंग करताना वेगवेगळ्या अँगल्सनी लॅन्डस्केप चितारत. यामधूनच ‘वेगळे’ करण्याची धडपड सुरू झाली. त्यांना चित्रकलेचा अक्षरश: नाद लागला. त्यांना बाबूराव पेंटर व्हायचे होते. तसा ते प्रयत्नही करत.

पुन्हा कॉलेज, अभ्यासाबरोबर चित्रकलेलाही त्यांनी वाहून घेतले. १९४४ साली कॉलेजच्या ‘राजारामियन’ या अंकात प्रथमच त्यांची चित्रे प्रसिद्ध झाली. असा प्रवास होत असताना त्यांची गाठ दीनानाथ दलाल यांच्या चित्रांशी पडली. नोकरीनिमित्त ते मुंबई आल्यावर दलालांच्या चित्रातील मोहकता, रचना, रेखीव मनुष्याकृती, आल्हाददायक रंगसंगती, जोरकस ब्रशचे फटकारे यांची ‘मोहिनी’ सरवटे यांच्यावर पडली. एवढी, की त्यांनी दलालांचे प्रत्येक चित्र जसेच्या तसे कॉपी करण्यास सुरुवात केली. कोणतेही चित्र ते दलालांसारखे रेखाटू लागले. स्वत:ची सहीही ते दलालांच्या सहीसारखी करू लागले. त्यावेळी कोल्हापूर-मध्ये लोक त्यांना ‘कोल्हापूरचे दीनानाथ दलाल’ असेच संबोधायचे. दलालांचे गारूड त्यांच्यावर एवढे होते की दलाल व्यंगचित्रे काढतात व त्यांची कव्हरही छापली जातात, म्हणूनच आपणही व्यंगचित्रे काढू शकतो व आपलीही कव्हर छापली जातील या एकाच हेतूने सरवटे व्यंगचित्रांकडे वळले.

त्यांचे पहिले व्यंगचित्र व्यावसायिक मासिक ‘महाद्वार’मध्ये छापून आले आणि त्यांच्या व्यंगचित्रकलेचा ऐरावत महाद्वारातून डौलाने, सुखनैव आजपर्यंत मार्ग आक्रमित आहे.


आज ज्या शैलीमध्ये त्यांची चित्रे आपण पाहतो तसे ते सुरुवातीला चितारीत नसत. ब्रशचा वापर ते करत, दलालांसारखा. त्याच वेळी आणखी एक व्यंगचित्रकार ‘नवयुग’साठी व्यंगचित्रे चितारत... बाळासाहेब ठाकरे. बाळासाहेब, आर.के.

लक्ष्मण व इतरांवरही ब्रिटिश व्यंगचित्रकार डेव्हिड लो यांचा प्रभाव होता. म्हणूनच, आपण काहीतरी वेगळे करावे असे रक्तात भिनलेल्या गुणामुळेच सरवटे यांनी ब्रशचा त्याग करून 'टाक' आत्मसात केला. आपल्यातला दीनानाथ दलाल त्यांना काढून टाकायचा होता. ते टाकाने वळणदार, सुबक रेषांनी चित्रे चितारू लागले.

सुरुवातीच्या काळात 'हंस'चे अंतरकर, 'वीणा'चे उमाकांत ठोंबरे यांनी प्रोत्साहन दिले, त्यांची व्यंगचित्रे छापून, त्यामध्ये काही सूचना करून. नंतरच्या काळात त्यांनी मासिकांची वा पुस्तकांची मुखपृष्ठे केली. ती वाखाणली जाऊ लागली आणि त्यातूनच प्रसिद्ध लेखकांच्या गळ्यातला ताईत म्हणजेच चित्रकार वसंत सरवटे असे समीकरण झाले. पु.ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, रमेश मंत्री, जयवंत दळवी, कवी विंदा करंदीकर इत्यादींचा त्यांना सहवास लाभला.

जयवंत दळवींच्या 'ठणठणपाळ'चे कॅरिकेचर करून कॅरिकेचरच्या दुनियेत त्यांनी पाय रोवला. अशीच त्यांनी अनेक साहित्यिकांची कॅरिकेचर केली व ती गाजलीही.


राजकीय व्यंगचित्रे का नाही केली या संबंधी बोलताना सरवटे म्हणतात, ''मला राजकारणात अजिबात रस नाही, आकर्षण नाही. व्यंगचित्र हे 'तरुणच' राहावं, कितीही काळ लोटला तरी त्याचा आस्वाद घेता आला पाहिजे. कोणत्याही व्यक्तीला ते 'डेड' वाटता कामा नये. ते राजकीय व्यंगचित्रांमध्ये घडत नाही. त्याचे आयुष्य एका दिवसाचेच. त्यात माझा पिंडही साहित्य व कलेशी इमान राखणारा...''




सरवटे निसर्गप्रेमी असल्याने, झाड जसे पाने, फुले, फांद्या, फळे यांनी डवरलेले असते तसेच आपली व्यंगचित्रकला अनेक शैलींनी बहरलेली असावी असे त्यांना वाटते आणि त्यामुळे त्यांनी आपल्या शैलीमध्ये अनेक बदल केले. युरोपीय व्यंगचित्रकारांकडूनच त्यांना चित्रशैलीमध्ये प्रयोग करण्याची स्फूर्ती मिळाली. त्यामध्ये अॅन्द्रे फ्रॅन्स्वा, नॉरमन थेलवेल, स्टाईनबर्ग, रॉबर्ट बेंचनी, रोनाल्ड सर्ल आदी प्रमुख व्यंगचित्रकारांची नावे घेता येतात. चपला, खुर्च्या, बैलगाडी, कैची यांसारखे विषय घेण्याची स्फूर्ती त्यांनी 'पंच' मासिकाकडून घेतली. अशा प्रकारे नाविन्याचा शोध घेण्यासाठी भारतीयही व्यक्तींचा मोठा हातभार लागला. 'मौज'चे राम पटवर्धन, श्री.पु. भागवत, 'ललित'चे केशवराव कोठावळे आदी. ललित मासिक म्हणजे सरवट्यांची प्रयोगशाळाच! मासिकाचा पहिला अंक निघाल्यापासून आजपर्यंत एकहाती ते त्या मासिकाचे कव्हर आणि चित्रांचा रतीब घालत आहेत.

व्यंगचित्रांच्या शैलीमध्ये व विषयामध्ये त्यांनी कसे अंचबित करणारे बदल केले यासाठी पुढील व्यंगचित्रे अभ्यासणे जरुरीचे आहे.

'सुगंधी तेलाचे फिरते एजंट' या व्यंगचित्रामध्ये सरवट्यांनी दलालांसारखे





ब्रशचे फटकारे, चित्राची रचना, त्यातील मनुष्याकृती व बॅकग्राउंड वापरले आहे. इतकेच काय, सहीसुद्धा दलालांसारखी आहे.

कोणीही विचार करू शकणार नाही असे विषय निवडणे ही सरवट्यांची खासियत. चपलांवर चित्रमालिका त्यांनी केली. सामाजिक विषय प्रखरपणे मांडण्याचे हे उत्तम उदाहरण. दोन चपला अख्खे जग फिरतात पण कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन घेऊ शकत नाहीत. दलितांवर मुजोर समाजाने कसा अन्याय केला याचे प्रत्यंतर या चित्रामध्ये घडते. चित्रशैली वापरताना तुटक रेषांच्या पुंजक्याने चित्र साकारले आहे. नाजूक रेषेचा वापर नाही.

इमारती व गर्दी या विषयावर अनेक चित्रे त्यांनी चितारली. ट्रेनमधील गर्दी, तरीही शिस्तबद्ध, अस्ताव्यस्ता नाही. टाकाने काढलेले चित्र. अनेक जाडबारीक रेषांचा वापर. त्या गर्दीतही माणसे आपला फायदा व अतिउत्साह कसा दाखवतात हे त्या ज्योतिष सांगणाऱ्यावरून आपणास कळून येते. इथे सरवटेंची काकदृष्टी दिसून येते.

'तो', 'ती' या व्यंगचित्रामधून अक्षरे वापरून केलेला प्रयोग, नवराबायकोचे संबंध कसे वा नवरा सतत संशयी कसा असतो याचे उत्तम उदाहरण या अक्षरांतून त्यांनी उभे केले आहे. याला ते 'अल्ट्रा दृश्य' हास्यरेषांची जात म्हणतात.

कॅरिकेचर करतानाही सरवटे त्या त्या व्यक्तीचे स्वभावचित्रण अचूक करतात. श्री.पु. भागवतांचे कॅरिकेचर अगदी सहज, साधे आहे;



''आता संशय तरी तुम्ही कुणाकुणाबद्दल घेणार म्हणते मी?''

पण बोलत असताना ते नेहमीच हाताच्या बोटांशी कसे खेळत हा त्यांचा स्वभाव त्यांनी बरोबर पकडला आहे. तसेच दुर्गा भागवतांचे कॅरिकेचरही त्यांचा स्वभाव सांगून जाते.

१९६५ मध्ये 'किर्लोस्कर' मासिका-मध्ये संपादक, लेखक, नाट्यसमीक्षक, कवयित्री, समीक्षक आदींवर काढलेली कॅरिकेचर व त्यातील भाष्यावर काही जण रागावल्याचे व हा एकच वाईट अनुभव संपूर्ण कारकिर्दीत आला असे सरवटे सांगतात .

पाठीवर थाप अनेकांनी दिली. त्यामध्ये विशेषत: ठणठणपाळचे कॅरिकेचर केल्यावर जयवंत दळवींनी दिलेली थाप त्यांना आजही आठवते. तसेच, मुलांच्या 'गंमतजंमत' या मासिकाबाबत यशवंतराव चव्हाणांनी काढलेले गौरवोद्‌गार अंगावर किलोभर मांस चढवतात असे सरवट्यांना वाटते.

व्यंगचित्रे ही साहित्याचा प्रकार असला तरीही सरवट्यांची व्यंगचित्रे अधिक साहित्यिकमूल्ये असणारी वाटतात. कारण त्यांना असलेली साहित्याची आवड, मोठमोठ्या साहित्यकारांबरोबरची संगत आणि नाविन्य शोधण्याची प्रायोगिकता. त्यांच्या चित्रांमध्ये 'कमरेखाली' केलेली 'साहित्यिक' टिप्पणी वा स्त्रीच्या सर्वांगावर केलेले वखवखलेले विनोद कधीच आढळत नाहीत. जीवनमूल्यांची व कलेची जाण त्यांनी सतत मनात ठेवली.

चित्रातील रेषेसंबंधी बोलताना ते म्हणतात, ''विषयाप्रमाणे परिश्रमपूर्वक केलेले रेखाटन, जोमदार रेषा, त्वेषपूर्ण रेषा, लयबद्ध रेषा, सहज मजेत घरंगळत फिरणाऱ्या रेषा याचा आस्वाद आपणास चित्रकलेची जाण असेल तर नक्कीच घेता येतो. केवळ एकसारख्या, लयदार, फोर्सफुल रेषा म्हणजेच सुंदर रेखाटन नाही.''

झीक झॅक, तुटक, थोड्याशा खडबडीत रेषाही परिणामकारक व सुंदर असतात याची जाण त्यांना अॅन्द्रे फ्रान्स्वाने करून दिली. चित्र साकारताना रेषेमधील सौंदर्य, अर्थघनता, सूचकता, उत्स्फूर्तता, रचना, लक्षवेधी अचूक मुद्दा ही सरवट्यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये. व्यंगचित्रांचा अर्थ हळूहळू उलगडत जावा; पण परिणाम मनावर कायमचा बिंबवा ते उत्कृष्ट व्यंगचित्र, असे ते मानतात.

गोप्याऽऽ गधड्याऽ खळीचा कागद कुठाय? हे व्यंगचित्र पाहताना प्रथम मला वाटले सरवटे व्यंगचित्रकारितेला कंटाळलेत. कारण जी व्यक्ती त्यांनी चितारली, तिची बोटे, पाय किंवा शरीर पाहून एखाद्याला चित्र जमत नाही असे वाटावे. त्यांच्याशी याबाबत चर्चा करताना जाणवले की तो त्यांचा प्रयोग होता वेगळ्या धाटणीचा.

सामाजिक, सांस्कृतिक बदलावर आधारित, म्हणजेच समाजाचा आरसा बनलेल्या अनेक व्यंगचित्रमालिका सरवट्यांनी साकारल्या आहेत.

फेब्रुवारी १९२७ मध्ये कोल्हापूर येथे जन्म घेतलेल्या वसंत सरवटेंनी अनेक क्षेत्रांत आपले पाय घट्ट रोवले. अनेक मानसन्मान त्यांना मिळाले. बीई सिव्हिल पदवीधर असलेले सरवटे मुख्य डिझाइन इंजिनीअर म्हणून १९८७ साली एसीसी सिमेंट कंपनीतून निवृत्त झाले.

त्यांनी अनेक पुस्तकांची कव्हर डिझाईन, हजारो कार्टून्स व असंख्य चित्रे तयार केली. ते माझ्या मते 'व्हिज्युलायझर कम इलस्ट्रेटर कम कार्टूनिस्ट' आहेत. पन्नास वर्षांहून अधिक काळ ते मौज, दीपावली, महाराष्ट्र टाइम्स, मोहिनी, हंस, आवाज इत्यादी नियतकालिकांमधून हास्यचित्रे करत आहेत.

व्यंगचित्रकला आणि देशी-विदेशी हास्यचित्रकारांवर विपुल रसग्रहणात्मक चिकित्सक लिखाण त्यांनी केले.

प्रकाशित साहित्य

१) खडा मारायचा झाला तर...!
२) सावधान! पुढे वळण आहे!
३) खेळ रेषावतारी
४) खेळ चालू राहिला पाहिजे...!
५) रेषालेखक - वसंत सरवटे

'सावधान! पुढे वळण आहे!', 'व्यंगचित्र : एक संवाद', 'सहप्रवासी' या पुस्तकांना महाराष्ट्र राज्य सरकारचा 'उत्कृष्ट साहित्य' पुरस्कार मिळाला आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्टूनिस्ट, बंगलोर, २००९चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे.

नुकताच सह्याद्री नवरत्न सन्मान २०१३ (दूरदर्शनचा) त्यांना लाभला.

गेली जवळजवळ ७० वर्षे सतत जीवनाची मूल्ये आपल्या व्यंगचित्रांमधून मांडणाऱ्या सरवटे यांच्या कल्पकतेला साथ देण्याचे व प्रयोगांसाठी ऊर्जा निर्माण करण्याचे काम त्यांची प्रिय पत्नी, लेकी- अंजली (आर्टिस्ट), मंजिरी (सी.ए.) व लेक सत्यजीत हे सतत करत आहेत.

सरवट्यांचे एक शल्य आहे, की सर्वकाही मनासारखे केले वा झाले, परंतु 'प्युअर मॅथेमेटिक्स' शिकता आले नाही. सरवट्यांच्या कारकिर्दीचा विचार केला तर असे वाटते की त्यांनी इंग्रजीमध्येही काम केले पाहिजे होते. अशा या स्वयंनिर्मित प्रयोगशाळेला सरकारी 'पद्म' वाकुल्या का दाखवत आहे? सरकारने जरूर विचार करावा.

**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com



रविराज गंधे

# भारतीय चित्रपट – जागतिक सिनेमाच्या वाटेवर

रविराज गंधे

‘साँस मे तेरी साँस मिल जाए... मुझे साँस आये’ गुलजारनं लिहिलेलं हे सुंदर गाणं सध्या लोकप्रिय आहे. भारतीय चित्रपटसृष्टी आणि सामान्य माणूस यांचं जिवाशिवाचं नातं याच प्रकारचं आहे असं म्हटल्यास वावगं ठरू नये. भारतीयांच्या जीवनाचा श्वास असलेल्या हिंदी सिनेमांच्या गाण्यांच्या अंगाखांद्यावर खेळता खेळता आपल्या अनेक पिढ्या लहानाच्या मोठ्या अन् म्हाताऱ्या झाल्या. सिनेमातल्या हिरो-हिरॉईनच्या वेशभूषेची-केशभूषेची स्पंदनं सर्व दशकांमधल्या तरुण पिढ्यांमध्ये सारखीच जाणवत राहिली. राजेश खन्नाचा कुडता, देव आनंदची ज्वेलथीफ-मधली कॅप, साधनाचा हेअरकट देशभर गाजले. तरुणाईनं आपलेसे केले. कॉलेजमध्ये असताना आम्हीही शत्रुघ्न सिन्हासारखी सिगारेटच्या धुराची सर्कल्स सोडत असू. ह्या विषयातील काही तज्ज्ञ मंडळी रजनीकांतप्रमाणे जळती सिगारेट तोंडात लपवण्याची करामत करत असत. सिनेमातील प्रेमभरी-दर्दभरी गाणी हा सर्वांचा वीक पॉईंट! लता-रफी-किशोर-आशा ह्यांच्या गळ्यातील दैवी सुरांची गाणी पडद्यावर गाताना पाहिलेल्या अनेक बेढब-माठ नट्या सुंदर भासत तर भारतभूषण, विश्वजीत, जॉय मुखर्जी यांसारखे अभिनयाचे ठोकळे ‘ग्रेट’ वाटत! एकूणच आपल्या जीवनातील अनेक सुखदु:खाच्या घटनांना कडू-गोड गोष्टींना अन् गुलाबी आठवणींना सिनेमाची झालर असतेच. सिनेमातल्या सुमधुर गाण्यांच्या प्रेमप्रसंगाचा, विरहदृश्यांचा एक अदृश्य असा सुंदर प्लेबॅक आपल्या मनात-आठवणीत सतत चालूच असतो, आपल्यासमोर टीव्ही, रेडिओ नसताना! हे काय गूढ आहे याचा उलगडा मला अजून झालेला नाही.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, स्वामी विवेकानंद आदी महान व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाची जगाला ओळख होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खऱ्या अर्थानं दोनच भारतीय जगभर लोकप्रिय होते. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि दुसरा राजकपूर! १८५३ नंतर जगभर औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. युरोपीय देशांत कारखानदारी, वित्तव्यवसाय, रस्तेबांधणी, वाहनउद्योग, दूरसंचार आदी क्षेत्रांत प्रगती होऊ लागली. या सर्व क्षेत्रांतील प्रगत तंत्रज्ञान भारतात तुलनेनं खूप उशिरा आलं. त्याला अपवाद फक्त एका श्रेत्राचा, तो म्हणजे चित्रपटनिर्मितीचा! ७ जुलै १८९६ रोजी फ्रान्सच्या ल्युमिए ब्रदर्सनी मुंबईत वॅटसन हॉटेलमध्ये ‘अरायव्हल आफ द ट्रेन’ हा पहिला चित्रपट लोकांना दाखवला आणि अवघ्या पंधरा-सोळा वर्षांत दादासाहेब फाळक्यांनी, १९१३च्या मे महिन्यात, ‘राजा हरिश्चंद्र’ हा चित्रपट तयार करून प्रदर्शित केला आणि भारतात चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. अवघ्या दीड-दोन दशकांच्या अवधीत भारतीयांनी; विशेषत: मराठी माणसांनी चित्रपटनिर्मितीचं तंत्रज्ञान आत्मसात केलं. चित्रपटनिर्मिती सुरू केली. प्रेक्षक आणि पैसाही मिळवला ही गोष्ट निश्चितच कौतुकास्पद आहे.

भारतीयांनी जेव्हा आयुष्यात पहिल्यांदा मोठ्या पडद्यावर धडाडत जाणारी आगगाडी पाहिली त्यावेळी काहीतरी भुताटकी आहे असं वाटत, भीतीनं सैरावैरा धावू लागल्याच्या आठवणी वाचायला मिळतात. प्रत्यक्षात १८५३ मध्ये बोरीबंदर ते ठाणे अशी आगगाडी धावली तेव्हा देखील हेच दृश्य पाहायला मिळालं होतं. घाबरलेल्या लोकांना धरून धरून गाडीत बसवावं लागे. आजचा लोकल गाड्यांवरील गर्दीचा महापूर पाहताना ही गोष्ट कपोलकल्पितच वाटावी. वास्तविक १८९० नंतर महाराष्ट्रात चित्रिपटनिर्मितीचे प्रयोग सुरू झाले होते. पुण्याच्या पटवर्धनबंधूंनी काचेच्या पारदर्शिकांचा वापर करून तयार केलेल्या तंत्राच्या साहाय्यानं केलेले ‘शांबरिका-खरोलिका’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चलचित्रांचे खेळ लोकप्रिय होते. खुद्द लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे आदी विभूतींनी हे खेळ पाहून पटवर्धनांची प्रशंसा केली होती. मुंबईत श्री.ना. पाटणकर, ए.बी. करंदीकर, दिवेकर आदी मंडळींनी एक फिल्म कंपनी स्थापन करून चित्रपटांची निर्मिती केली होती. दादासाहेब तोरणे यांनी १९१२



राजा हरिश्चंद्र

साली 'भक्त पुंडलिक' या चित्रपटाची निर्मिती केली होती. परंतु संपूर्ण महाराष्ट्रात त्याचं 'राजा हरिश्चंद्र'सारखं प्रदर्शन झालं नाही. काही अभ्यासकांच्या मते 'भक्त पुंडलिक' हाच पहिला भारतीय चित्रपट आहे. या सर्व मंडळींच्या अथक प्रयत्नांचं, मेहनतीचं आणि जिद्दीचं दर्शन आज आपल्याला भारतीय चित्रपटसृष्टीच्या विशाल महावृक्षात पाहायला मिळतं.

आपण भारतीय चित्रपटसृष्टीचा विचार करतो तेव्हा प्रामुख्यानं हिंदी आणि मराठी, मल्याळी, तामीळ, तेलगू, बंगाली आदी प्रादेशिक भाषांतील चित्रपटसृष्टीचा विचार करणं, त्यांच्या निर्मितीची गुणवैशिष्ट्यं आणि वेळोवेळी झालेली स्थित्यंतर पाहणं गरजेचं आहे.

'संत तुकाराम' हा पहिला मराठी बोलपट १९३२ साली पुण्याच्या आर्यन थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. त्यावेळी विष्णुपंत पागनीसांनी वठवलेली तुकारामांची भूमिका खूप लोकप्रिय झाली होती. घरोघरी त्यांचे फोटो लागले होते. नंतरच्या काळात मराठी सिनेमांच्या निर्मितीची धार्मिक-पौराणिक, कुटुंबप्रधान, ग्रामीण जीवनावरील अन् तमाशाप्रधान चित्रपट अशी ढोबळ मानानं विभागणी झाली. स्वातंत्र्यानंतरच्या दशकांमध्ये भालजी पेंढारकर, बाबूराव पेंटर, राजा परांजपे, अंनत माने, राजदत्त, व्ही. शांताराम, मास्टर विनायक आदी दिग्गज मंडळींनी विविध चित्रपटांची निर्मिती करून मोलाचं योगदान दिलं. १९६०-७०च्या दशकांपर्यंत मराठी चित्रपटांना बऱ्यापैकी वैभव लाभलं होतं. 'चिमुकला संसार', 'गुळाचा गणपती', 'रामराज्य', 'अमर भूपाळी', 'देवबाप्पा', 'श्यामची आई', 'मधुचंद्र', 'मुंबईचा जावई', 'साधी माणसं' अशा अनेक दर्जेदार आणि मनोरंजक चित्रपटांना प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. या काळात अनेक चित्रपटांमधील गदिमांची गाणी आणि सुधीर फडक्यांच्या चाली लोकप्रिय झाल्या. चंद्रकांत-सूर्यकांत, निळू फुले, अरुण सरनाईक, रमेश देव आदी कलाकार खूप लोकप्रिय होते. 'एक गाव बारा भानगडी'सारखे चित्रपट यशस्वी होऊ लागले. याच सुमारास आलेल्या जयश्री गडकरच्या 'सांगत्ये ऐका'पासून महाराष्ट्रात तमाशापटांची सुरुवात झाली. 'जगाच्या पाठीवर', 'मोलकरीण' आदी असंख्य सिनेमांमधून सीमा, सुलोचना आदी अभिनेत्रींनी आपल्या कसदार अभिनयाचं दर्शन घडवलं. दादा कोंडक्यांच्या 'सोंगाड्या'नं महाराष्ट्रात धुमाकूळ घातला. 'पांडू हवालदार'नं मराठी चित्रपटसृष्टीला अशोक सराफसारखा गुणी कलाकार दिला. लक्ष्मीकांत बेर्डे-अशोक सराफ ही जोडी खूप गाजली परंतु नंतर नंतर तोच तो विनोद आणि रूटीन कथानक यामुळे ती प्रभावहीन झाली. सचिन आणि महेश कोठारे यांच्या करमणूकप्रधान चित्रपटांना प्रेक्षकांनी उचलून धरलं. ह्या दोघांची चित्रपटमाध्यमाची जाण विलक्षण आहे. तंत्रावर हुकूमत आहे. परंतु चित्रपटमाध्यमाचा त्यांनी गांभीर्यानं कधी विचार केला नाही. आगळ्यावेगळ्या आशय-विषयाची वाट चोखाळली नाही. व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा' आणि जब्बार पटेल यांच्या 'सामना'नं अभूतपूर्व यश मिळवलं. दुर्दैवानं हे सातत्य अन् झळाळी १९७० नंतरच्या दशकांत राहिली नाही. अजूनही मराठी चित्रपटांवर नाटकाचा प्रभाव आहे. त्यामुळे ती वाचाळ वाटतात. चित्रपटाची आपली अशी दृश्यांची एक भाषा असते. तिचा कलात्मक वापर होताना दिसत नाही. संगीत हा चित्रपटाचा प्राण असतो. त्याकडे अलीकडच्या मराठी चित्रपटांमधून अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचं दिसतं. पूर्वीच्या चित्रपटांसारखी लोकप्रिय गाणी प्रेक्षकांच्या ओठांवर नसतात. चित्रपटांचं कथानक अजूनही पारंपरिक, मध्यमवर्गीय, कुटुंबप्रधान समस्यांभोवती फिरताना दिसतं. या मानसिकतेला छेद देण्याचे प्रयत्न तरुण कल्पक दिग्दर्शकांनी २००० सालाच्या सुरुवातीला सुरू केले. ह्या सिनेमाकर्मींनी कुठलीही आर्थिक गणितं न मांडता, व्यावसायिक तडजोड न करता, आपल्याला आवडलेल्या विषयावर हवा तसा चित्रपट बनवण्याची जिद्द दाखवली. त्याचा परिणाम असा झाला की आशय-विषयाच्या दृष्टीनं आगळेवेगळे सुंदर चित्रपट मराठी रसिकांना पाहायला मिळाले. अमोल पालेकरांचा 'कैरी', 'धूसर'; राजीव पाटलांचा 'जोगवा', 'बाबू बॅन्ड बाजा', 'टिंग्या', 'झिंग चॅक झिंग', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' अशा अनेक चित्रपटांचा उल्लेख करावा लागेल. अक्षय दत्तच्या 'आरंभ'नं मराठी सिनेमाचा डोळा धीट झाल्याचं जाणवलं. 'ताऱ्यांचं बेट', 'शाळा', 'वळू', 'देऊळ' अशा चाकोरीबाहेरच्या चित्रपटांची प्रशंसा झाली. 'श्वास'नं तर राष्ट्रपतीपदक मिळवून ऑस्करपर्यंत धडक मारली. नव्या दमाच्या तरुण दिग्दर्शकांचं, निर्मात्यांचं हे आश्वासन महत्त्वाचं आहे.



पथेर पांचाली

प्रादेशिक चित्रपटांच्या पार्श्वभूमीवर बंगाली चित्रपटसृष्टी आशय-विषय-कलात्मक निर्मितीच्या दृष्टीनं कायम आघाडीवर राहिली. मुळात बंगाली माणूस हा हाडाचा कलावंत आणि सृजनशील वृत्तीचा! बंगाली चित्रपटांना रवींद्रनाथ, शरद्‌चंद्र, बंकीमचंद्र अशा थोर लेखकांच्या समृद्ध साहित्याचा वारसा लाभला ही त्यांची मोठी जमेची बाजू. या सर्व चित्रपटांमधून तत्कालीन सरंजामशाही, गरिबांचं शोषण, स्त्रियांची दु:खं यांचं वारंवार प्रभावी आणि उत्कट दर्शन होतं. सत्यजित रे यांचा 'पथेर पांचाली' हा पटकथेचा-दिग्दर्शनाचा-निर्मितीचा आदर्श नमुना म्हणून गणला गेलेला चित्रपट. हा खऱ्या अर्थानं पहिला प्रायोगिक चित्रपट म्हणता येईल. सत्यजित रे यांचे पुढील अनेक चित्रपट मैलाचे दगड ठरले.

देवकी बरुआ, नितीन बोस, बिमल रॉय आदी असंख्य दिग्दर्शकांच्या अभिरुचीपूर्ण चित्रपटांनी बंगाली चित्रपट समृद्ध झाला. मृणाल सेन यांच्या 'भुवनशोम' ह्या नितांतसुंदर चित्रपटामुळे वास्तववादी चित्रपटांची लाट हिंदीत आली. त्यांचे 'अमानुष', 'बालिका बोधू' हे बंगाली चित्रपट गाजले. सुहासिनी मुळे, उत्तमकुमार, उत्पल दत्त, सुचित्रा सेन, शर्मिला टागोर या कलाकारांची राष्ट्रीय पातळीवर प्रशंसा झाली. न्यू थिएटर्सनं केलेल्या अनेक चित्रपटांचा अन् दिग्दर्शकांचा दबदबा दीर्घकाळ बंगभूमीत होता. एका अर्थानं बंगाली चित्रपटांनी कलात्मकता जपत प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध मोठी चळवळ उभी केली आणि हेच बंगाली चित्रपटांचं वैशिष्ट्य ठरलं!

कर्नाटकातील चित्रपट आपल्या प्रादेशिक वैशिष्ट्यांसह प्रेक्षकांपुढे आले. गिरीश कासारवल्ली यांचा धार्मिक परंपरांविरुद्ध हल्ला चढवणारा 'घटश्राद्ध' हा चित्रपट उल्लेखनीय होता. बी.व्ही. कारंथ यांच्या 'चोमना दुडी' ह्या चित्रपटानं अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार पटकावले. जी.व्ही. अय्यर यांचा भूदान चळवळीवर आधारित, त्यात झालेल्या फसवणुकी संदर्भातील चित्रपटाला समीक्षकांची वाहवा मिळाली. कन्नड चित्रपटांमधून गिरीश कर्नाड, लोकप्रिय अभिनेता राजकुमार, अभिनेत्री खुशबू ही मंडळी देशभर लोकप्रिय झाली. अर्थात अशा काही प्रयोगांव्यतिरिक्त सर्व प्रादेशिक भाषांतील बहुसंख्य चित्रपट हे करमणूकप्रधान व्यावसायिक होते हे खरंच. पंजाबी, सिंधी, आसामी भाषांत चित्रपट-निर्मिती झाली, पण तिचा दर्जा सुमार राहिला. भोजपुरी चित्रपट हे करमणूकप्रधान अन् बऱ्यापैकी व्यवसाय करणारे असतात. 'जमना किनारे', 'परबतिया पंडिताईन' अशा चित्रपटांनी चांगला व्यवसाय केला. सुपरस्टार रवीकिशन हा भोजपुरी अमिताभ बच्चन म्हणून ओळखला जातो.

गुजराती भाषेत बंगाली किंवा तमीळ भाषेसारखी मोठ्या प्रमाणावर चित्रपटनिर्मिती होत नाही. बहुसंख्य चित्रपट हे परावलंबी स्त्रियांचं दु:ख वर्णन करणारे आणि सती जाणाऱ्या स्त्रियांचा महिमा गाणारे निघतात. वास्तविक, गुजराती साहित्य अतिशय समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे. महात्मा गांधींच्या विचारसरणीचा वारसा ह्या भूमीला लाभला. त्याचं दर्शन चित्रपटांमधून होताना दिसत नाही. चंदूलाल शहा यांचा 'अछूत' आणि केतन मेहता यांचा 'भवनी-भवाई' हा लोककथेवर आधारित दर्जेदार चित्रपटांचा उल्लेख करावा लागेल. तेलुगू-तमीळ चित्रपटांमध्ये पौराणिक-ऐतिहासिक चित्रपट मोठ्या प्रमाणावर निघाले. एन.टी. रामाराव हे राम-कृष्णाच्या भूमिकांत महानायक झाले. के. विश्वनाथ, ए. सुब्बाराव बापू आदी मंडळींनी तेलुगू चित्रपटसृष्टीत मोलाचं योगदान दिलं. एम.जी. रामचंद्रन यांनी तमीळ



भुवनशोम



**शोले**

चित्रपटांमध्ये स्वत:चं स्थान निर्माण केलं. पुढे ते मुख्यमंत्रीही झाले. चित्रपटांचा बादशहा रजनीकांत याचं दक्षिणेत प्रचंड फॅनफॅलोईंग आहे. मणिरत्नम्नं 'रोजा', 'बॉम्बे'सारखे सुंदर चित्रपट दिले. छाया-प्रकाशाचं अद्‌भुत चित्रण करण्याचं विलक्षण कसब मणीकडे आहे. राजकारण आणि तमीळ चित्रपट यांचं जवळचं नातं राहिलं. द्रमुकची, अण्णा दुराई, करुणानिधी ही मंडळी चित्रपटांसाठी पटकथा लिहीत असत. शिवाजी गणेशन, जयललिता ही मंडळी राजकारणात आघाडीवर राहिली आहेत.

१९३५नंतरचा काळ हिंदी चित्रपट-सृष्टीचा बहारीचा काळ होता. त्यावेळी के.एल. सहगल नावाचा गाण्याचा जादुई चिराग सर्वत्र झगमगत होता. देवदास, प्रेसिडेंट, चंडिदास अशा अनेक सिनेमांतील गाण्यांची, भजनांची, गजलांची जनमानसावर जबरदस्त मोहिनी होती. आजही आहे. 'एक बंगला बने न्यारा!', 'सो जा राजकुमारी'..., 'दो नैना मतवारे'.. अशा एकापेक्षा एक सरस गीतांनी आबालवृद्धांना पागल केलं होतं. हाच सिलसिला पुढे सोहराब मोदी, पृथ्वीराज कपूर, राज कपूर, देव आनंद, दिलीपकुमार, मीनाकुमारी, मधुबाला, सुरैय्या आदी असंख्य गुणी कलाकारांच्या चित्रपटांमधील सुमधूर गाण्यांतून चालू राहिला. सी. रामचंद्र, मदनमोहन, नौशाद, शंकर-जयकिशन यांसारखे प्रतिभावंत संगीतकार तसंच साहिर, शैलेंद्र, मजरूह सुलतानपुरी यांसारखे गीतकार या मंडळींनी हिंदी सिनेमाला खूप मोठं केलं. आपल्या अनेक सुपरहिट चित्रपटांमधून राजेश खन्नानं सुपरस्टारपद मिळवून रसिकांना भुरळ घातली. अमिताभ बच्चन ह्या महानायकाचा करिष्मा तर आजही अबाधित आहे. बहुसंख्य चित्रपट हे करमणूकप्रधान नाच-गाणी, विनोदाचा-शृंगाराचा मालमसाला असलेले प्रामुख्यानं आहेत. नाही म्हणायला त्यात पौराणिक, कुटुंबप्रधान, रहस्यमय अशी ढोबळ विभागणी करता येईल. बहुसंख्य चित्रपट हे लोकांना आवडतील असे, तसंच भारतीयांच्या विचारसरणीला, परंपरेला रुचतील असेच बनवले जातात. सिनेमा पहिल्यावर पैसा वसूल झाला पाहिजे असा प्रेक्षकांचा आजही आग्रह आहे. त्यामुळे तुलनेनं कमी वास्तववादी चित्रपट हिंदीमध्ये निघाले. बासू भट्टाचार्य, बासू चतर्जी, श्याम बेनेगल, गोविंद निहलानी, एस.एम. संथ्यू आदी मंडळींनी आशयघन चित्रपट दिले. त्याची खूप प्रशंसा झाली. 'मंथन', 'निशांत', 'गरम हवा', 'चक्र', 'अंकुर' अशा चित्रपटांमधून शोषित वर्गाच्या दु:खाला वाचा फोडली गेली. सामाजिक समस्यांचा वेध घेतला गेला. असं असलं तरी हिंदी चित्रपट हा प्रकृतीनं पलायनवादी अन् करमणूकप्रधानच राहिला. गुरुदत्त, बिमल रॉय यांचे 'प्यासा', 'कागज के फूल' किंवा 'बंदिनी' हे क्लासिक म्हणून गणले गेले तरी आशयाच्या दृष्टीनं त्यांची झेप फार मोठी नव्हती. 'दो आँखे बारह हाथ', 'डॉ. कोटणीस की अमर कहानी' असे काही वेगळे चित्रपट व्ही. शांताराम यांनी दिले. त्याचं कौतुक झालं. परंतु त्याच सुमारास चार्ली चॅप्लीन अमेरिकेत करत असलेले ग्रेट डिक्टेटर, द कीड, मॉर्डन टाइम्स इत्यादी चित्रपट किंवा जपानमध्ये कुरोसोवानं केलेले 'राशोमान', 'सेव्हन समुराय' आदी प्रचंड आवाका असलेले चित्रपट अन् आपले दिग्दर्शक करत असलेले चित्रपट यामध्ये जमीन-अस्मानाचं अंतर होतं हे लक्षात घेणं आवश्यक आहे. भारतीय चित्रपटांची सुरुवातच पौराणिक चित्रपटांनी झाली असल्यानं आशयप्रधान, वास्तववादी चित्रपटांची निर्मिती संथगतीनं झाली.

सत्यजित रे ह्या एकमेव दिग्दर्शकाला ऑस्कर अ‍ॅकेडमीनं 'डायरेक्टर ए मेरिटस्' हा विशेष सन्मान देऊन गौरवलं. परंतु आजतागायत एकाही भारतीय चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा ऑस्कर पुरस्कार मिळालेला नाही. सुदैवानं गेल्या आठ-दहा वर्षांत काही भारतीय चित्रपटांना नामांकनं मिळू लागलीत. कलाकार तंत्रज्ञांनाही पुरस्कार मिळू लागलेत ही समाधानाची बाब आहे. अजूनही आपला भारतीय सिनेमा मोठ्या प्रमाणावर कौटुंबिक सुखदु:खाच्या साचेबंद कहाण्यांत आणि नाचगाण्यात अडकला आहे का? माणसाच्या जीवनातील चिरकालीन मूल्याचा-वेदनेचा-स्वप्नांचा कलात्मक पातळीवर उत्कट शोधबोध चित्रपटांमधून घेणं आवश्यक आहे असं वाटतं. आजच्या अनेक तरुण प्रतिभावान दिग्दर्शकांमध्ये ती ताकद आहे. अर्थात, ऑस्कर मिळालेले सर्वच चित्रपट ग्रेट होते असं नव्हे! परंतु तो जागतिक कीर्तीचा मानदंड आहे. सुदैवानं जाणकार लोक आता जागतिक पातळीवर भारतीय चित्रपटांची चांगली दखल घेऊ लागलेत. भारतीय सिनेमा जागतिक होण्याच्या दृष्टीनं हे सुचिन्ह आहे.

**- रविराज गंधे**
५८/८ बसंतस्मृती, पांडुरंगवाडी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com


# ‘ऑल द प्रेसिडेंट्स मेन रिव्हिजिटेड’

अपर्णा पाटील

बोस्टनमधल्या मॅरॅथॉन स्पर्धेच्या वेळी झालेल्या बॉम्बस्फोटानं अमेरिका पुन्हा एकदा भयभीत झाली. बोस्टनमध्ये बॉम्बस्फोट झाला, त्याच आठवड्यात डिस्कव्हरी चॅनेलनं एक डॉक्युमेंटरी सादर केली. या डॉक्युमेंटरीत एक असा विषय हाताळला गेला होता की, ज्यामुळे चाळीस वर्षांपूर्वी अमेरिका बॉम्बस्फोटाइतकीच हादरली होती. विषय होता, अमेरिकेतील ‘वॉटरगेट’ प्रकरण.

खरं तर या डॉक्युमेंटरीचा आणि बोस्टनमधल्या बॉम्बस्फोटाचा काडीएक संबंध नाही. आजच्या पिढीला वर्षभरातल्या घटनेचं विस्मरण होतं, तिथे तीस-पस्तीस वर्षांपूर्वीच्या प्रकरणाची काय कथा! ज्यांनी ती घटना अनुभवलीय, त्यांना मात्र आजही त्या घटनेचं मोल किती जास्त आहे, हे सांगावसं वाटतं. अमेरिकेच्या राजकारणातलं ते जबरदस्त स्कॅंडल होतं, म्हणून नाही तर राष्ट्राध्यक्षांनाही पदावरून खेचण्याची ताकद सर्वसामान्य म्हणता येतील, अशा दोन माणसांकडे कशी असू शकते, यासाठी. म्हणून वॉटरगेट प्रकरण वारंवार लोकांसमोर येत राहिलंय.

हे प्रकरण घडलं १७ जून १९७२ रोजी. एक साधीशी चोरी म्हणून विसरून जावं, इतकी किरकोळ घटना घडली होती. पण हिमनगाचं टोक असणारं हे प्रकरण जगाला हादवणारं ठरलं. १९७२ मध्ये घडलेल्या या वॉटरगेट प्रकरणाला खोदून काढणारे पत्रकार बॉब वूडवर्ड आणि कार्ल बर्नस्टीन यांनी १९७४ मध्ये त्यावर पुस्तक लिहिलं. त्यावर १९७६ मध्ये सिनेमा काढण्यात आला. ‘ऑल द प्रेसिडेंट्स मेन’, असं त्या सिनेमाचं नाव




**‘वॉटरगेट’ ही संज्ञा १९७२ ते ७४ च्या दरम्यान घडलेल्या राजकीय स्कॅंडलसाठी वापरली गेली. त्यानंतर वॉटरगेट या शब्दाचा वापर राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचाराशी संबंधित प्रकरणासाठी नित्यनेमानं होऊ लागला. भारतात सध्या जे कोळसा भ्रष्टाचार प्रकरण सुरू आहे, त्याचा उल्लेख इंग्रजी दैनिकांत कोलगेट असा केला जातो. तेच वॉटरगेट प्रकरण एका डॉक्युमेंटरीच्या निमित्तानं पुन्हा एकदा चर्चेला आलं...**

होतं. तर आता त्या सिनेमावरची डॉक्युमेंटरी काढली आहे. जी डिस्कव्हरी या चॅनेलवर दाखवली गेली. सिनेमात बॉब वूडवर्डची भूमिका रॉबर्ट रेडफोर्ड आणि कार्ल बर्नस्टीनची भूमिका डस्टीन हॉफमननं केली होती. तर सिनेमाचा निर्माता आणि अभिनेता असलेल्या रेडफोर्डनं तयार केलेल्या त्या डॉक्युमेंटरीचं नाव आहे, ‘ऑल द प्रेसिडेंट्स मेन रिव्हिजिटेड’.

खरं तर अमेरिकेला आपला गौरवशाली इतिहास पुन्हा पुन्हा चाळायचा मोह टाळता येत नाही. पण वॉटरगेट प्रकरणाची आठवण होणं त्रासदायकच. ही घटना घडली तेव्हा वर्तमानपत्रं हीच एक गोष्ट लोकांच्या माहितीचा खरा स्रोत होती. प्रत्येकजण त्यातल्या माहितीच्या आधारे आपलं मत बनवत होता. ती एक विश्वासार्ह अशा संवादसाधनांपैकी एक होती. त्यामुळेच वॉटरगेटमधल्या चोरीच्या घटनेच्या मुळाशी जाणारे पत्रकार हे अमेरिकन हिरो ठरले. त्याहीपेक्षा राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांना आपल्या पदाचा राजीनामा देण्यासाठी भाग पाडणारे ठरले.

राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन हे विसाव्या शतकातलं सगळ्यात औत्सुक्यपूर्ण राजकीय व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीची सुरुवात १९४७ मध्ये झाली. आठ वर्षं उपराष्ट्राध्यक्ष असलेल्या निक्सन यांचा १९६० मध्ये पराभव झाला. या पराभवानंतर स्वतःला सिद्ध करण्यासाठी ते पुन्हा १९६८च्या निवडणुकीला रिपब्लिकन पक्षातर्फे उभे राहिले. जे. एफ. केनेडी, अब्राहम लिंकन या दोन राजकीय नेत्यांच्या हत्यांनंतर अमेरिकेतल्या राजकीय अस्वस्थतेच्या काळात, २० जानेवारी, १९६९ रोजी ते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. त्यांनी अमेरिकेनं व्हिएतनामविरोधात केलेल्या

युद्धाला अमेरिकन जनतेचा मूक पाठिंबा असल्याचं चित्र उभं केलं. प्रत्यक्षात स्थिती नेमकी उलटी होती.

वॉटरगेट प्रकरण घडण्याची कारणं बरीच होती. त्यापैकी एक होतं व्हिएतनाम युद्ध. ज्यावेळी निक्सन नोव्हेंबर १९६८ मध्ये पहिल्यांदा राष्ट्राध्यक्ष बनले, त्यावेळी त्यांनी गुप्तचर यंत्रणा अधिक ताकदवान बनवण्याचा निर्णय घेतला.

'द न्यू यॉर्क टाइम्स'नं १३ जून, १९७१ रोजी पेंटागॉनची गुप्त कागदपत्रं प्रसिद्ध करून या व्हिएतनाम युद्धामागची खरी कारणं उघड केली. मुळातच या युद्धाविषयी जनतेमध्ये नाराजी होती. अमेरिकेनं केवळ राजकीय स्वार्थासाठी देशाची लष्करी ताकद पणाला लावली होती. वर्तमानपत्रात हे सारं उघड झाल्यानं अमेरिकन जनता नाराज झाली. त्यामुळे निक्सन यांनी, पेंटागॉनमधील कागदपत्रं उघड करण्यामागे नेमकं कोण आहे, हे शोधण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामाला लावली. त्यांच्या राजकीय विरोधक असलेल्या डेमोक्रॅटिक पक्षाचाही यात हात असावा, अशा समजातून त्यांच्या कार्यालयात चोरी करण्यासाठी काही माणसं नेमली. तसंच तिथल्या फोनला टॅपिंग यंत्रणा बसवण्यासाठी ही योजना आखली गेली. चोरीसाठी माणसं नेमली असं म्हणायचं कारण असं, की ते चोर म्हणजे सीआयएचे हस्तक होते. प्रत्यक्ष पकडले जाण्यापूर्वी दोन-तीनदा त्यांनी मुख्यालयात शिरण्याचा प्रयत्न केला होता.

वॉटरगेट हे नाव वॉशिंग्टनमधल्या हॉटेलचं होतं. त्या अलिशान हॉटेलमध्ये काही महत्त्वाची मंडळी आपला मुक्काम ठोकून असत. काही निवासी खोल्या आणि कार्यालयं होती, आजही आहेत. याच ठिकाणी असलेल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या मुख्यालयात ७ जून १९७२ रोजी चोरी झाली. सुरक्षारक्षक फ्रँक विल्सला चोरी झाल्याचं लक्षात आलं नसतं, तर अमेरिकेतलं हे भलंमोठं प्रकरण घडलंच नसतं.

चोरी झाली त्या दिवशी फ्रँकनं कार्यालयाचा दरवाजा लावलेला; पण कुलूप



न लावलेल्या स्थितीत पाहिला. कोणीतरी दरवाजाच्या लॅचला टेप चिकटवलेली होती. त्यामुळे त्यानं ती टेप काढून दरवाजा पुन्हा लावला. पुन्हा एक तासानं तो गस्तीवर आला असता पुन्हा टेप जशीच्या तशी दिसली. त्याला चोरी झाल्याची शंका आली. पोलिसांना बोलावलं. पोलिस पोहोचले तेव्हा त्या कार्यालयात असलेल्या पाचजणांना पकडलं. त्यांच्याकडे काही रोकड आणि फोन टॅपिंगशी संबंधित यंत्रणा सापडल्या.

त्या पाच जणांना, खुद्द निक्सन यांनीच या कामगिरीसाठी नेमल्यानं आपण सुटणार अशी खात्री होती. त्यामुळे पोलिसांपाशी जबाब देताना, आपण सीआयएसाठी काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. डेमोक्रॅटिक पक्षाच्या मुख्यालयातून गोपनीय माहिती मिळवण्यासाठी ही चोरी केली गेली होती. हे सारं समजताच व्हाइट हाऊसला त्याची माहिती देण्यात आली. निक्सन यांनी हात झटकले, तरी त्या प्रकरणाचा बोभाटा होऊ नये, यासाठी सगळी राजकीय, प्रशासकीय यंत्रणा त्यांनी कामाला लावली.

जेव्हा हे सगळं घडत होतं, तेव्हा प्रसिद्धी माध्यमं म्हणजे त्यावेळची वर्तमानपत्र मात्र राष्ट्रध्यक्षपदाची आगामी निवडणूक कव्हर करण्यात मग्न होती. त्यामुळे त्या चोरीच्या घटनेबाबत फार गांभीर्यानं पाहिलं गेलं. पण प्रत्यक्षात निक्सन यांनी या प्रकरणाला दडपण्यासाठी व्हाइट हाऊस, प्रशासकीय यंत्रणा, न्यायव्यवस्था इतकंच नाही तर एफबीआय, सीआयए यांना कामाला लावलं होतं. त्यामुळे सत्य बाहेर येणं आवश्यक होतं. एफबीआयच्या एका अधिकाऱ्यानं ही बातमी थेट पत्रकारांपर्यंत पोचवण्याचं धोकादायक पाऊल उचललं. एफबीआयच्या त्या अधिकाऱ्याला आपलं नाव उघड होण्याची भीती होती, पण सत्य तर लोकांपर्यंत जाणं महत्त्वाचं वाटलं. बॉब वूडवर्ड आणि कार्ल बर्नस्टीन या पत्रकारांचा तो सोर्स बनला. त्याचा उल्लेख डीप थ्रोट (जगातली पहिली ब्ल्यू फिल्म म्हणून उल्लेख असलेलं हे नाव अनेकांच्या लक्षात राहिलंय) असा करत हे सगळं प्रकरण वर्तमानपत्रात आलं. एफबीआयमधील वरिष्ठ अधिकारी मार्क फेल्ट हेच डीप थ्रोट असल्याचं पुढे उघड झालं.

सुरुवातीला केवळ चोरीच्या घटनेचा फॉलोअप म्हणून माहिती घ्यायला गेलेल्या पत्रकारांना, रिपब्लिकन पक्षाच्या निवडणुकीच्या फंडातून त्याच पाच जणांना चेक देण्यात आल्याची माहिती मिळाली होती. या प्राथमिक माहितीमुळेच थेट निक्सन यांच्यावरचा संशय वाढला. तरी ते मात्र आपला यात हात नसल्याचं सांगत होते. त्यांच्या कार्यालयातल्या फोनवरून, ते प्रकरण दडपण्यासाठी काय काय करताहेत, हे उघड होऊ शकणार होतं.

निक्सन यांनी फोन टॅप करण्याची यंत्रणा इतरांची गुप्त संभाषणं ऐकण्यासाठी बसवली होती. त्यांच्याकडे कित्येक संभाषणांच्या फिती होत्या. व्हाइट

हाऊसमधील टेलिफोनच्या संभाषणांच्या टेप्सवरून ही गोष्ट पुढे सिद्ध झाली. निक्सन सरकार आणि प्रशासकीय अधिकारी मात्र सातत्यानं या चोरीशी आपला संबंध असल्याचं नाकारत राहिले. पण तरीही संभाषणांच्या टेप्स बाहेर काढण्यात मीडियाला यश आलं. त्यापूर्वी अनेक टेप्स नष्ट केल्या गेल्या. ज्या जनतेसमोर उघड झाल्या असत्या तर त्यांचे गुन्हेगारांशी असलेले संबंध उघड झाले असते.

फेब्रुवारी १९७३ मध्ये वॉटरगेट प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमण्यात आली. त्या समितीनं लोकांसमोर आणलेलं सत्य खळबळजनक आणि धक्कादायक होतं. या प्रकरणात निक्सन यांचे व्हाइट हाऊसमधले सल्लागार जॉन डीन हे देखील अडकले होते. नवे ॲटर्नी जनरल रिचर्ड बोर्क यांनी, निक्सन यांच्यावर थेट खटलाच भरला. त्यामुळे सुप्रीम कोर्टानं निक्सन यांना टेप्स सादर करण्याचे आदेश दिले. या प्रकरणी आपल्यावर महाअभियोग चालणार असं समजताच, निक्सन यांनी राजीनामा दिला.

निक्सन यांची कार्यपद्धती वादग्रस्त होती. पण वॉर लॉबीचा त्यांना पाठिंबा होता. त्यामुळे निक्सन यांचा दबदबा आणि पोहोच सगळ्यांना धडकी भरवणारी होती. त्यांच्या प्रशासकीय यंत्रणेतील माणसंही त्यांना साथ देणारी आणि त्यांच्याशी निष्ठा राखणारी होती. त्यामुळे वॉटरगेट प्रकरण थेट निक्सन यांच्यावर कधीच उलटणार नाही, असा विश्वास होता. त्यामुळेच इतकं सगळं होऊनही ते राष्ट्रध्यक्षपदावर पुन्हा निवडून आले. पण पत्रकारांच्या महत्त्वाच्या कामगिरीमुळे अखेर त्यांना राजीनामा द्यावाच लागला. पदाचा राजीनामा देणारे ते एकमेव अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ठरले. ४३ जणांवर खटले भरण्यात आले. निक्सन यांच्या कार्यालयातल्या डझनभर अधिकाऱ्यांचाही त्यात समावेश होता.

निक्सन १९७३ मध्ये पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्ष झाले खरे पण महाअभियोगाच्या धसक्यानं त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर राष्ट्राध्यक्ष पदासाठी गेराल्ड फोर्ड यांची नेमणूक झाली. त्यांनी निक्सन यांची या प्रकरणातून सुटका केल्यानं तेही वादग्रस्त ठरले. वॉटरगेट प्रकरण १९७३ च्या प्रारंभाला सुरू झालं ते पुढच्या अठरा महिन्यांपर्यंत सुरू राहिलं. ८ ऑगस्ट १९७४ रोजी राष्ट्राध्यक्ष निक्सन यांच्या राजीनाम्यानं हे प्रकरण संपलं.

अमेरिकेच्या इतिहासातलं हे सगळ्यात गाजलेलं प्रकरण पुन्हा उगळणं म्हणजे अमेरिकन धोरणांचा जाहीर पंचनामाच. त्यामुळे या प्रकरणाची दशा आणि दिशा काय, हे सांगण्यासाठी बॉब वूडवर्ड आणि कार्ल बर्नस्टीन यांनी पुस्तक लिहिलं. त्या पुस्तकावरूनच पुढे सिनेमा आला त्यासाठी रेडफोर्ड यांनी निर्माता आणि अभिनेता अशी दुहेरी भूमिका पार पाडली. मुळात ही घटना अमेरिकन थ्रीलरपटात शोभून दिसणारी. दोन पत्रकार, ते भिन्न प्रवृत्तीचे. सीआयए, एफबीआय या गुप्तचर यंत्रणांबाबत जाणून घेण्याची त्यावेळी कमालीची उत्सुकता होती (आजही आहेच). एफबीआयचा एक अधिकारी रात्री, पहाटेच्या वेळी त्यांना भेटून एका मोठ्या राजकीय स्कँडलची माहिती पुरवतोय, आणि जगावर राज्य करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असलेला अमेरिकाचा राष्ट्राध्यक्ष हतबल होत, स्वतःचं पद सोडतो, हा मसालाच इतका जबरदस्त होता, की सिनेमा काढणं हे अपरिहार्य होतंच.

डस्टीन हाफमन आणि रेडफोर्ड यांनी ही भूमिका करण्यापूर्वी, त्या दोन्ही पत्रकारांची भेट घेतली होती. अगदी आजच्या जगात ब्रँजेलिना, सैफिना असे शब्द जोड्यांसाठी प्रचलित आहेत. पण वॉटरगेट प्रकरणाच्या वेळी वूडस्टीन हा शब्दप्रयोग त्या दोन पत्रकारांसाठी केला गेला होता.

'ऑल द प्रेसिडेंट्स मेन रिव्हिजिटेड' या डॉक्युमेंटरीत काय दाखवलंय, तर हा सिनेमा आणि प्रत्यक्ष घटनेत सहभागी असलेली माणसं आता या घटनेबाबत काय म्हणतात ते. दोन तासांच्या या फिल्ममध्ये सत्तरच्या दशकातल्या त्या वादग्रस्त घटनेच्या संदर्भातील व्हिडिओ आणि संभाषणाच्या फितींचे तुकडे यांचा समावेश केला आहे. ही घटना घडली त्यानंतर निक्सन यांनी पाठवलेले हे चोर, आपल्यावर आपला बॉस काहीच कारवाई करणार नाही, याची खात्री बाळगून होते. त्यापैकी एकानं तर, या घटनेवर एक मनोरंजक सिनेमा होऊ शकतो, असंही सांगून टाकलं होतं. प्रत्यक्षात त्यावर बनलेला सिनेमा मनोरंजनासाठी तयार केला नव्हता, हेच या डॉक्युमेंटरीतून दाखवलं गेलंय.

रेडफोर्डनं ही डॉक्युमेंटरी करताना, जे प्रकरण पुस्तकात वाचायला मिळणार नाही, ते काय होतं हे कळावं याचा विचार केला आहे. सध्याच्या जगात फेसबुक, ट्विटर यांनी प्रसिद्धी माध्यमांची जागा व्यापली आहे. कदाचित आज असं एखादं प्रकरण घडलं, तर ते कसं हाताळलं जाईल, याची झलक यात आहे.

'ऑल द प्रेसिडेंट्स मेन' हा सिनेमा ज्यांनी पाहिला असेल त्यांना त्याचा शेवट नक्कीच आठवत असेल. दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झालेल्या निक्सन यांचं भाषण टीव्हीवर सुरू आहे. टाइपरायटरवर बातमी–मथळा टाइप होत जातं. नंतर तारखेप्रमाणे वॉटरगेट प्रकरणाची परिणती कशी झाली, हे केवळ त्या टाइपरायटरनं कंपोज केलेल्या एकेका ओळीतून समजतं. तो शेवट खूपच परिणामकारक होता. एखादं प्रकरण आता घडलं आणि उघडकीस आलं तर त्याचा शेवट असा होईलच अशी खात्री नाही. कारण राजकीय क्षेत्राशी संबंधित स्कँडल शेकड्यांनी घडताहेत. अगदी गावपातळीवरून ते अमेरिकन व्हाइट हाऊसपर्यंत प्रकरणं कशी दडपायची असतात, यासाठी वेगळी यंत्रणा राहिली नाही. तर त्या यंत्रणेतली माणसं तो सिस्टिमचा भाग स्वीकारत चालली आहेत.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# अस्सल कलावंत, बुरगुंडाकार निरंजन भाकरे

राजीव जोशी

महाराष्ट्राच्या मातीमध्ये लोककला शतकानुशतके रुजलेल्या आहेत. कुठलंही ग्लॅमर नसताना, प्रकाशझोतात येण्याची शक्यता नसताना अनेक कलावंतांनी आपलं तन-मन झोकून त्यासाठी काम केलं. जुन्या रचना जिवापाड जपल्या. जुन्या परंपरांचं जतन केलं आणि हा आपला सांस्कृतिक वारसा आजच्या पिढीपर्यंत आणून ठेवण्याचं मोलाचं काम केलं आहे. काळाच्या ओघात काही लुप्त झाल्या तर काही अजूनही टिकून आहेत आणि एखाद्या वारकऱ्याच्या निष्ठेनं आपली कला हे कलावंत पुढे नेत आहेत. अशा मोजक्या अस्सल कलावंतांमध्ये अग्रणी असलेल्या निरंजन भाकरेंची खास घेतलेली ही मुलाखत म्हणजे त्यांच्या प्रयत्नांचा, परिश्रमांचा आणि पराक्रमाचा जणू एक शब्दपटच!

प्रश्न – तुम्ही मूळचे कुठले? तुमचं लहानपण कसं होतं? त्याकाळात तुमच्यावर कलेचे, लोककलेचे संस्कार झाले होते का?

भाकरे – आमचं गाव रहिमतबाद, तालुका-सिल्लोड आणि जन्म झाला १० जून १९६५ या दिवशी. आम्ही जातीनं दिगंबर जैन शिंपी. माझा जन्म झाला तेव्हा मी अवघ्या चार दिवसांचा असताना मला उचलून फेकून दिलं गेलं! त्याचा परिणाम अजूनही उजव्या हातावर झालेला आहे. आमचे वडील तसे रंगकर्मी. ते सोयगावच्या लोटू पाटलांच्या श्रीराम नाट्यमंडळातून कामं करायचे. त्याकाळी रहिमतबादला नागेश्वर प्रासादिक मंडळी, आदर्श नाटक मंडळी अशा नाटकाच्या संस्था होत्या. त्यात दिगंबर जैन, सुतार, सोनार, ब्राह्मण, खंडेलवाल व मारवाडी समाजाचे कलाकार काम करायचे आणि संगीत मृच्छकटिक, सुशील मनोरमा, संगीत तुकाराम, सोन्याची लंका, संगीत शारदा, संगीत संशयकल्लोळ अशी नाटकं बसवायचे. माझे वडील तुकारामाची मुख्य भूमिका करायचे. गावोगावी नाटकांचे, मेळ्यांचे प्रयोग व्हायचे. त्या टायमाला लोटू पाटील म्हंजे प्रस्थ व्हतं. अनेक कलाकार व्हते. मला वाटतं जयमाला इनामदारबाईसुद्धा त्यांच्या नाटक कंपनीत व्हत्या.

लहानपणीच्या गोष्टी सांगायच्या तर १९७२ ला जो मोठा दुष्काळ पडला, त्यात आमचा मराठवाडा भरडूनच गेला. अनेकांनी तिथून स्थलांतर केलं. जवळपास पंचवीस टक्के लोक भुकेनं मेल्ये! माझ्या आईच्या तर डोक्यावर परिणामच झाला.

माझे मोठे भाऊ दादा– सुमतीनाथ – हे माझे अन्नदाते. आत्याकडे दत्तक दिल्यानं आडनाव 'भाकरे'. दुष्काळामुळे आमचीबी दैना झाली. घरात पागल झालेली आई, अशावेळी आमाला गावानं जगवलं. दुष्काळावर उपाय म्हणून सगळीकडे नालाबंडिंगची कामं रोजगारहमी योजनेखाली सुरू झालेली व्हती. आमचे दादा जायचे. त्यांच्यासंगं मीबी जायचो. गरीब मजूर पोटासाठी उन्हातान्हात राबत व्हते. दोन वर्षं पाऊस झालेला नव्हता. गरिबी म्हणजे किती अन् कशी असावी याची तुमाला कल्पना नाय येनार! मजुरांसाठी दुपारी सुगडीची गाडी यायची. सुगडी कशी आधीच कोरडी, त्यात पाणी प्यायला नाही. पोट भरण्यासाठी कोरडी सुगडी खायालाच लागायची. मजुराला अेल्युमिनियमची वाटी–वाडगा दिलेला असायचा. परिस्थिती इतकी खराब व्हती की धोतरावर कण सांडले, तरी ते चटकीनी खाल्ले जायचे. मजुरमंडळी त्यांच्या घोसातला घोस मला देत असत. तिथं, ते समदं बगता–बगता, मी गानं तयार केलं सुगडीचं–

> छुमछुम छुमछुम चाले, ठुमकत चाले
> बैलाची गाडी
> आली सुगडीची गाडी
> अरे चाल चाल.. आली सुगडीची गाडी
> कोरड्या सुकडीची भुकटी गिळता,
> ताठ झाली नाडी
> आली सुगडीची गाडी

पुढे जरा परिस्थिती सुधारली. आमी मातीच्या घरात राहाया गेलो. घरात उषाचे शिवणयंत्र व्हतं आणि एक शेळी. यकदा आमची आई आडात पडली नि त्याबरूबर तिचं पागलपन गेलं. ती सुधारली. ती शिवणकाम करू लागली. त्याच्यावर तिनं आमाला जगवलं, वाढवलं, मोठं केलं.

त्या टायमाला मी नाटककार वसंत जाधव (मुंबईतील प्रसिद्ध कामगार नाटककार) ह्यांच्या 'नवा संसार' या नाटकात यामिनी/संध्याची भूमिका केली. त्यात चार भावांचं कथानक होतं आणि एकत्र राहण्याचे फायदे सांगितलेले व्हते.

प्रश्न – तुम्ही स्त्रीपार्टी म्हणून काम करत होता, असं का?

भाकरे – हो. कारण श्रावणात ग्रंथ लावायचे– शिवलीलामृत वगैरे. त्यातून गैरसमज की आता लुगडं नेसलं, तर पुढचे




सात जन्म हिजडा! म्हणून अनेकजण नकार द्यायचे. मी आधी बाल संभाजी म्हणून सुरुवात केली नि नंतर चिलया बाळ, 'बाजी'मधील 'मैनावती', 'कलेचा संसार'मधील 'विमल', 'फिर्याद'मध्ये 'दया' अशी सर्व स्त्रीपात्रांची कामं केली.

पाटील, सरपंच, बेईमानी असं ग्रामीण-सामाजिक धर्तीचं कथानक असायचं. मारवाडी समाजाकडे अमाप संपत्ती असायची. मग भक्त दामाजीमध्ये – पोतंभर पैशांचा संदर्भ देणारा अभंग असायचा. उदाहरणार्थ, खळखळा ओतल्या मोहरा!

पुढे ही परंपरा मोडकळीस आली आणि लोकनाट्यं होऊ लागली. चित्रसेन गंधर्व, दुर्वास ऋषींचा रंभेला शाप! अर्थात घोडीचं लग्न! त्या लोकनाट्यांना मानधन म्हणून गावातर्फे एक नारळ आणि दोनशे रुपये असं दिलं जायचं. तसंच आमी गणपतीच्या मेळ्यात दोनशे रुपये घेऊन लोकनाट्य करायचो.

एकदा तर गंमत झाली. एका शोनंतर सिल्लोडच्या इलेक्ट्रिक कंपनीचा ऑफिसर मला 'दत्तक' घ्यायलाच आला व्हता. तेव्हा माझ्या दादांनी सपष्ट नाही सांगितलं.

प्रश्न – या सगळ्यात नोकरी-प्रपंचाचं कसं काय जमवलंत?

भाकरे – कामं करता करता मी शिकत व्हतो. त्याचा परिणाम म्हंजे १९८१ मध्ये मी दहावी पास झालो. माझी शाळा म्हणजे गजानन विद्यालय. पुढचं शिक्षण घेण्याचा प्रश्नच नव्हता. पैसा कुठे व्हता? मला ५४ टक्के गुण मिळाले. शिक्षक म्हणाले, डोक्यावरून पाणी!

पुढे माझं लग्न झालं. आमचे पाहुणे औरंगाबादचे. तिथे ल्युपिन कंपनीत सात रुपये रोजावर कॅज्युअल म्हणून काम मिळालं. ते काम मी अवघं दोन महिने दोन दिवसच केलं. मला अपेक्षा व्हती की आपल्याला अप्रेंटिस म्हणून लेटर मिळालंय. पण एक दिवस उशीर झाला की काय, पण माझं कार्ड पंचच नाही झालं नि माझी नोकरी गेली! तेव्हा मी दिवसाला सात रुपये कमावायचो नि त्यातलाच एक रुपया नाश्ता-जेवणासाठी मला लागायचा. ल्युपिन सुटली नि माझ्या जीवनाची दुर्दशा सुरू झाली. एक नोकरी गेली की दुसरी. अशा अनेक नोकऱ्या केल्या. पुढे महिना सहाशे रुपये कमवायचो, त्यातले चारशे रुपये घरी पाठवायचो. नशीब फिरलं होतं. काय करणार? असा मी सुमारे दोन वर्षं औरंगाबादमध्ये राहिलो.

मधल्या काळात दहावी झाल्यावर टेलरिंगचं दुकान काढण्यासाठी दहा हजारांचं कर्ज काढलं होतं. त्याचं काय झालं तो किस्सा पुढे येईलच.

प्रश्न – मग अशोकजी, कसे भेटले आणि त्यांनी बुरगुंडा आणि भारुडात कसं गुंतवलं?

भाकरे – त्याचं काय झालं, की माझ्या राजपुत समाजातील एका तबलावादक मित्रानं मला दोन वर्षं सांभाळलं. एका शनिवारी मला अचानक कावड वानवले भेटले. ते गाणी, भजनं म्हणायचे. गुरुदेव सेवामंडळाचे सदस्य होते. ते मला अशोकजी परांजपे यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी मला प्रेमानं जवळ घेतलं नि विचारलं– तू मराठवाड्याचा ना. तुला भारुड येतं का? मी 'नाही' सांगितलं. मग विचारलं की माझ्याकडे येशील का? तिथून माझ्या आयुष्यातला नवीन प्रवास सुरू झाला. दर शनिवारी-रविवारी मी अशोकजींकडे जाऊ लागलो. तिथे ग्रंथ वाचून दाखवणं अशी पडेल ती कामं करायचो. गुरूच्या घरी सेवा करतात तसं मी दोन वर्षं काम केलं. ते मला भाड्याचे पैसे आणि वरखर्चासाठी पैसे द्यायचे. त्यातून प्रपंचखर्च चालायचा. मात्र त्यांनी माझ्यात एक 'भारुडकार' जन्माला घातला. 'बुरगुंडा' हा शब्द अशोकजींचाच. पुढे मी 'भारुड' या प्रकारात खूप काम केलं.

प्रश्न – भारुडकार म्हणून काय काय केलंत?

भाकरे – मी त्यावेळचे सामाजिक प्रश्न भारुडातून मांडले. त्यातून थेट लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न केला. मी जवळपास १५० वेगवेगळे विषय सादर केले. अगदी बचतगटापासून पाणलोट, कुष्ठरोग, एड्स, साक्षरता अभियान, वृक्षसंवर्धन वगैरे. ग्लोबल वॉर्मिंग ह्या विषयाचं तर पंचवीस टक्के सँक्शन मलाच मिळालं होतं. मात्र पुढे २००१ मध्ये माझ्या आयुष्यात एक वेगळा प्रश्न उभा राहिला. त्याचं असं झालं, की मी दहावी झाल्यावर टेलरिंगचं दुकान काढायचं म्हणून औरंगाबाद-जालना ग्रामीण बँकेकडून कर्ज घेतलं होतं. वाढत वाढत ते दहा हजार रुपयांवरून नव्वद हजार रुपये इतकं झालं. तेव्हा मॅनेजर माझ्याकडे जप्तीसाठी आले. आले तेच एकदम संतापून भडाभडा बोलत. मी मात्र त्यांचं अत्यंत शांतपणे, नम्रपणानं स्वागत केलं. हा गुण मी अशोकजींपासून घेतला. ते म्हणायचे की माणसानं कसं नम्रपणानं वागावं. ते मॅनेजर बडबडत होते,


बुरगुंडा!

तेव्हा दारात पोस्टमन हजर झाला. मला 'मराठवाडाभूषण' पुरस्कार जाहीर झाला होता. कारण त्याआधी आंतरराष्ट्रीय साक्षरता परिषदेत मी 'पहिला क्रमांक' घेतला होता. वीस राज्यांत पहिला नंबर आणि 'यशवंतराव कलातपस्वी' पुरस्कार मिळाला. ती आनंदाची बातमी ऐकल्यावर मॅनेजरसाहेब निवळले, त्यांना माझी दया आली. म्हणाले, की गोलेगावला गटप्रमुखांचा मेळावा आहे, तुम्ही या. तिथे चेअरमन भेटले, म्हणाले- डॉक्युमेंट घेऊन या! दरम्यान दोन-तीन वर्षं मला माझे मित्र सुदेश पाटील-बनकर ह्यांनी सांभाळलेलं. त्याचे वडील सरपंच. मी मुंडेंची दहा हजार माणसांची सभा होती तिथे कार्यक्रम केला. चेअरमन भेटले. माझी विचारपूस केली. मी टेलर आहे असं सांगितलं. तर ते म्हणाले, तुम्ही कलाकार आहात. गुण पाहिले, म्हणून भेटायला बोलावलं. ते औरंगाबाद-जालना ग्रामीण बँकेचे चेअरमन होते. त्यानी मला बचतगट/शेतकरी मंडळांसाठी तीन गावांत कार्यक्रम मिळवून दिले. त्याचं मानधन दिलं नि त्यातले दहा हजार रुपये खात्यात टाका असं सांगितलं. अशा रीतीनं कलेद्वारे कर्जफेड केली. त्यांचे उपकार मी कधीच विसरू शकणार नाही.

प्रश्न - मग पुढे कार्यक्रमांचा धडाका लावलात का?

भाकरे - हो. मी वेगवेगळे कार्यक्रम करू लागलो. गारखेडा गावात ग्रामीण महिलांसाठी कार्यक्रम केला. परिणाम म्हणजे शंभर टक्के गावानं आपली खाती बँकेत उघडली. (आता आपले अर्थमंत्री आणि रिझर्व्ह बँक - 'फायनान्शिअल इन्कल्युजन' म्हणून हेच तर तत्त्वज्ञान अमलात आणायला सांगत असतात की!)

चेअरमननं मला तिथल्या तिथे पाच हजार रुपयांचं इनाम दिलं. अवघ्या १७ दिवसांत माझं संपूर्ण कर्ज 'नील' झालं. हा माझ्या जीवनातला मोठा 'टर्निंग पॉइंट' म्हणायला पाहिजे. मला मार्ग सापडला होता. त्या मार्गावरून पुढे चालू लागलो, नव्हे; धावू लागलो.

मला तर पुढे नादच लागला. संदीप जाधवनगरला वॉटर संस्थेत होते. त्यांनी कार्यक्रम दिला. गावाचा विकास आणण्यासाठी, पोपटराव पवारांसाठी कार्यक्रम केले. चार-पाच हजार अशी गर्दी असायची. बचतगटांसाठी दिवसाकाठी कार्यक्रम करायचो. तसेच समाजकल्याण खात्यासाठी - दारुबंदीचे कार्यक्रम केले. मला साँग ॲण्ड ड्रामासाठी ए ग्रेड आर्टिस्ट म्हणून मान्यता मिळाली.

नाथांची भारुडं - १२५ भारुडांचा छापील संग्रह होता. औरंगाबादच्या कुमुदताई गोसावी या संतसाहित्याचं विवेचन करणाऱ्या अभ्यासक. त्यांनी काही भारुडं दिली. अशोकजी परांजपे यांनी कार्यक्रम कसा करावा हे सांगितलं. आणि मी दारूबंदी, एड्स अशा सामाजिक प्रश्नांवर पोवाडे, बुरगुंडा लिहून सादर करू लागलो.

प्रश्न - आणखी कार्यक्रम आणि जीवनानुभव सांगता का?

दारूच्या समस्येवर मी अनेक कार्यक्रम केले. एक कविता घेतली. मी तिचं गाण्यात रूपांतर केलं. त्यात एक दु:खी स्त्री कावळ्याला आपलं दु:ख सांगते. एका दारुड्याच्या बायकोची व्यथा त्यात मांडलेली आहे. त्यातल्या शेवटच्या दोन ओळी पाहा-

'गेलं चांदीचं जोडवं, गेला पितळेचा हंडा
चार खापरे उरली, गेला कुंकवाचा करंडा'

वरील ओळीत ती चार खापरं म्हणजे ती बायको स्वत: आणि तीन मुली. आमच्या गावोगावच्या कार्यक्रमांमुळे त्याचा प्रभावी परिणाम झाला. अनेकांनी दारू सोडली. एकानं मात्र आधी खूप गोंधळ घातला. आमचं सामानसुमान उचकटून फेकलं, पण दुसऱ्या

- ३१ डिसेंबर २०१० रोजी प्रशांत दामले फॅन फाउंडेशनतर्फे १६ दिग्गज कलाकारांना घेऊन रात्रभर कार्यक्रम करण्यात आला, त्यात भाकरेंचा सहभाग होता.
- कमलाकर सोनटक्के यांच्यामुळे दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्यशाळेतील (National School of Drama-NSD) मुला-मुलींना शिकवण्याची संधी मिळाली. त्यांना अध्यात्माबद्दल सांगितलं, पोवाडा शिकवला आणि वासुदेव दाखवला. मुलं नाचली.
- विजया मेहतांनी ग्लोबल वॉर्मिंगबद्दल कार्यक्रम दिला आणि तो हिंदीत नाही तर मराठीतून करायला सांगितला.

  मुंबई विद्यापीठात भारूडावर व्याख्यान तेही मानधन न घेता दिलं. एका मुलीला 'भारूडकार' म्हणून तयार केलं.

  टेलर म्हणून काम करत असताना हुंडा न घेणाऱ्या नवरदेवाचे कपडे फुकट शिवून देण्याचा उपक्रम करून त्याद्वारे हुंडाविरोधी चळवळीला कृतीनं साथ.
- मिळालेले पुरस्कार - लोककला पुरस्कार, दादा पुरस्कार, मराठवाडा-भूषण पुरस्कार.
- सोयगाव येथील तरुण मंडळींनी 'श्रीराम नाट्यमंडळा'चे पुन:रुज्जीवन केले व ह्या संस्थेचे नाव - 'भारूडरत्न निरंजन भाकरे मंडळ, सोयगाव, नाट्यपंढरी' असे करण्यात आले आहे.

दिवशी त्यानं शपथ घेऊन दारू सोडली!

महिलांसाठी मी कार्यक्रम करायचो तेव्हा 'स्व'चा अर्थ समजावून सांगायचो. बचतीचं महत्त्व सांगायचो.

पंचतत्त्वांची महती सांगताना, जल, जंगल, जन, जमीन आणि जनावर अशा पाच 'ज'मुळे ब्रह्मांडाची निर्मिती झाली आणि माणसाचा जन्म झाला म्हणून ही पंचतत्त्वं महत्त्वाची कशी याचं विवेचन करायचो.

मी कार्यक्रम करत होतो. एकदा शाहीर विश्वास साळुंखे मला म्हणाले, ''तू सुपरवायझर म्हणून का कामं करतोस? स्वत:ची पार्टी काढ. तेव्हा मी कॅज्युअल कलाकार म्हणून काम करत असे, ते काम सोडावं लागलं.

देवगिरी नागरी सहकारी बँकेचे कवठेकरसाहेब मला म्हणाले, ''तुम्ही आम्हाला आठवड्यातून एकदा एक करमणुकीचा कार्यक्रम द्या.'' मी त्यांना म्हटलं की माझ्याकडे 'भारूड' आहे, तुम्ही मला विषय द्या! त्यांनी मला त्यांचा वार्षिक अहवाल दिला. त्याच्यावर मी पोवाडा सादर केला नि तो तुफान रंगला. साहेब म्हणाले की ''आमचं काम तुमच्या पोवाड्यानं समजलं. कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे आम्हाला प्रत्येकी पाचशे रुपये दिले.'' पुढे मग अहवालावरून पोवाडे करण्याचा धडाकाच लागला. सर्व अर्बन बँकांचे वार्षिक अहवाल घेत त्यांचे मी पोवाडे केले!

त्यानंतर मला व्यसनमुक्तीचे कार्यक्रम केल्याबद्दल दादा... हा राज्य पुरस्कार प्राप्त झाला. त्यानंतर मी काही काळ 'दि पपेट पॉप्युलर थिएटर' केलं. तेव्हा मी घरी मुखवटे तयार करायचो. टेलर असल्याचा मला तेव्हा फायदा झाला.

१९९५ च्या पूर्ण ऑगस्ट महिन्यात मी काम केलं. साक्षरतेबद्दलचा तो कार्यक्रम होता. त्यात वीस राज्यं, त्यांचे संघ सहभागी झाले होते. इंदिरा गांधी स्टेडियमवर गच्च गर्दीत कार्यक्रम झाला. आपल्याकडे न शिकलेल्या माणसाला बैल म्हणतात. मी काय केलं, की झूल घातलेला बैल उभा केला. त्याच्यावर लिहिलं होतं – 'मेरी भी सुनो, साक्षर बनो! म्हणजे बघा, की एक बैल मानवाला सांगतोय की शिका, साक्षर बना! माझ्यावानी आडाणी राहू नका!' हा संदेश सगळ्यांना खूप परिणामकारक वाटला. आपला महाराष्ट्राचा संघ – माझा संघ – सर्व वीस राज्यांतून पहिला आला. बेस्ट ठरला!

पुढे, म्हैसूरला अखिल भारतीय पातळीवर एक सांस्कृतिक मेळावा झाला. त्यात मी एक लोकनृत्य केलं.

पाणलोट क्षेत्राचे जनक जर्मनीचे हार्मन फादर बाखर आले होते. आम्ही पूर्ण महाराष्ट्रात ३५०० किलोमीटर संदेशयात्रा काढली. तेव्हा तीस पाणलोट सेवक आमच्यासोबत होते. आम्ही संदेश दिला की दुष्काळाला पाणलोटाशिवाय पर्याय नाही.

एका बाजूनं कार्यक्रम, फिरती, भटकंती चालू असताना माझा प्रपंच वाढत होता. मुलगा शेखर आता दहावीला आहे आणि तो पायापेटी वाजवतो. मध्यंतरी माझ्या मुलीचं लग्न झालं, तेव्हा कै. विठ्ठलराव उमप आले होते. त्यांनी कार्यक्रमाद्वारे अख्ख्या गावाला रडवलं. तसंच कावीळ झाली असताना शाहीर साबळेही आवर्जून आले होते. मी धन्य झालो.

दिवाळीला माझी आई गेली. तिच्या स्मृतीसाठी मी महोत्सव करतो. २००७ मध्ये मला ५१ हजार रुपयांचा राज्य पुरस्कार मिळाला. त्यातून मी हा उपक्रम करतो. शालेय गटासाठी निबंध स्पर्धा घेतली, त्यात ३००० स्पर्धक मुलं–मुली सहभागी झाली होती. रहिमतबादला सात आदर्श मातांचा आम्ही सत्कार केला. त्यावेळी एका पोलिस पाटलाच्या बायकोचा सत्कार केला. कारण पोलिस पाटील वारल्यावर त्या बाईनं व तिच्या मुलानं हिमतीनं गावाचं रक्षण केलं होतं. त्याचवेळी ज्योती आंबेकर–अजय आंबेकर (ज्योती– दूरदर्शन वृत्तनिवेदिका/संपादिका आणि अजयराव – सांस्कृतिक संचालक होते) यांनीच माझं नाव अशोक हांडेंना 'मराठीबाणा'साठी सुचवलं आणि त्यात 'बुरगुंडा' सामील झाला.

डोंबिवलीत भारूडावर पाच दिवसांचा कार्यक्रम केला होता. एका महिलेनं पाहिला. तिची आई गंभीर प्रमाणात आजारी होती. माउंटअबूला ब्रह्मकुमारी आश्रमात नेलं. मी कार्यक्रमाची डिव्हीडी पाठवली. तिच्या आईनं पाहिली. आई पुढे एक–दोन वर्षं जगली. आम्हा दोघांत बहीण–भावाचं नातं तयार झालं.

माझा जन्म होण्याआधी माझ्या बापानं खूप खूप प्रयत्न केले की मी या जगात येऊ नये! खंडेलवाल आणि एक बुढ्ढ्याकडे जाऊन पोटातलं मूल पाडण्याचा प्रयत्न केला. तरीही मी जन्माला आलो आणि एक भारूडकार म्हणून लोकांसमोर आलो. माझ्या या जन्माला येण्याचं सार्थक झालं असं मला वाटतं.

बुरगुंडाच्या माध्यमातून मी देशसेवा करतो आहे. भारूडकला पुढच्या पिढीला, संपूर्ण देशाला–जगाला दाखवण्याचा प्रयत्न करतो आहे. त्याला यश मिळावं हीच मागणी आहे.

**– राजीव जोशी**

rjoshi@gols.in


**मनाचे कवडसे**

**विश्वास काकडे**



**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**

**टपाल खर्च ३० रु.**

# 'वाहे गुरु!'

डॉ. माधवी मेहेंदळे

थंडीच्या लाटांमधून आणि पावसाच्या सरींमधून आमची गाडी आमच्या गारठलेल्या स्थितीनिशी प्रवास करत होती. बऱ्याच दिवसांनी आगगाडीतून प्रवासाचा योग आला. पंजाबची छोटी छोटी गावं नजरेस पडत होती. नजर जाईल तिथवर गव्हाची गडद हिरव्या रंगाची शेतं, पार क्षितिजापर्यंत ऐसपैस पसरली होती. हिरव्या गडद शेतांच्या चौकोनात एखादा पिवळाधमक चौकोनपण दिसत होता, सरसोच्या फुलांचा. नाजूक फुलांचे घोसच्या घोस त्या चौकोनात असायचे. नंतर नंतर जिथे जिथे मोकळी जागा घराच्या अवतीभवती असायची तिथे तिथे अगदी घरांच्या भिंतींपर्यंत सरसोची पिवळी रांगोळी दिसायची. शेतांमध्ये बऱ्याच ठिकाणी अगदी सैन्यातल्या शिपायांसारख्या शिस्तीत उभी असलेली संपूर्ण निष्पर्ण झाडं जागोजागी दिसली. ती पोपलार वृक्षांची होती असं नंतर समजलं. 'जब वुई मेट'सारख्या सिनेमांमधून पंजाबशी जेवढी ओळख झाली होती त्यात आता भर पडत होती. छोटी छोटी चौकोनी घरं- विटांची बांधलेली. सर्वांना गच्ची. त्यावर खाटा. काही माणसं बसलेली, पहुडलेली. तिरक्या छपरांच्या झोपड्या - आपल्याकडे दिसतात तशा दिसल्या नाहीत.

वाटेतल्या स्टेशनांची मजेशीर नावं नजरेस पडत होती. एका स्टेशनचं नाव होतं 'खन्ना'. नंतर कळलं की अमृतसर व त्याच्या आसपासच्या प्रदेशातून आलेल्या नामांकित मंडळींमध्ये राजेश खन्ना, विनोद खन्ना ही नावं होती. ही मूळची 'खन्ना' गावाचीच असावीत. मदनलाल धिंग्रा, दीप्ती नवल, दीपा मेहता, मीरा नायर, किरण बेदी, नरेंद्र चंचल, महेंद्र कपूर, शमशाद बेगम अशी बडी बडी नावं अमृतसरच्या नामांकित मंडळींच्या यादीमध्ये दिसली.

रूळांच्या बाजूची जागा एक सलग मैलोन्मैल पसरलेली अक्षय कचराकुंडी झाली होती. विषण्ण वाटायचं त्याकडे बघून. साऱ्या देशभर रूळांच्या जंजाळाबरोबर ह्या कचराकुंडीच्या जंजाळानंही आपलं जाळं फैलावलेलं असणार. काय करू शकतो यासाठी आपण? त्या खोलगट जागेत पाणीही साठलेलं होतं. या सगळ्यातून काही चांगलं निर्माण होऊ शकेल काय - कुणाच्या तरी डोक्यातून एखादी सुपीक कल्पना निघू शकेल आणि साऱ्या रूळांच्या बाजूला अक्षय कचराकुंडीऐवजी अक्षय सौंदर्यस्रोत बहरू शकेल?

सध्यातरी आपल्या नजरेनं कचराकुंडी टाळून त्याच्या पुढच्या दृश्यावर थेट उडी घेतलेली बरी. अमृतसर स्टेशनवर उतरल्यावर सार्वजनिक वाहनांचा देशव्यापी संप आहे असं लक्षात आलं. नाइलाजानं सायकल-रिक्षाला शरण जावं लागलं. कुणीतरी शारीरिक कष्टानं आपल्या देहाचा भार ओढत आहे, हे खरं म्हणजे कुठल्याही दृष्टीनं रुचणारं नाही, पण काय करणार? आपण नाही म्हटलं तरी रिक्षावाल्यांच्या रोजीरोटीसाठी त्यांच्या रिक्षातून कुणीतरी प्रवास करायलाच हवा.


पण एकंदर सायकलरिक्षानं प्रवास करताना, वेग कमी असल्यानं, शहर छान न्याहाळता आलं. पाकिस्तानपासून आपण फक्त ३० किलोमीटर अंतरावर आहोत या विचारानं जरा अस्वस्थही व्हायला झालं.

आपण महाराष्ट्रात आपल्या घरी असताना सीमारेषेपासून किती लांब असतो. मधे मधे धक्के देणारे बॉम्बस्फोट आपल्याही आजुबाजूला आता होतात. ते धक्के सोडले तर दैनंदिन जीवनात हे सगळं आपल्यापासून लांबच असतं. पण आता हाच रस्ता, ज्यावरून आम्ही जात होतो, पुढे ५० किलोमीटरवर लाहोरला आम्हाला नेऊ शकत होता. आता वाटत होतं, इकडच्या लोकांचे किती सगेसोयरे सीमारेषेपलीकडे अडकले असतील. फाळणीच्या झळांची आच आपल्यापर्यंत आली नाही. जे काही माहिती आहे ते पुस्तकं-कथा-सिनेमांमधून. त्यामुळे अप्रत्यक्षच.

सायकलरिक्षानं हॉटेलपर्यंत सोडलं. अंधारून आलं होतं. रिक्षावाल्याला थांबवून ठेवलं. थोडंसं हॉटेलमध्ये टेकून आल्यावर त्यालाच सांगितलं की सुवर्णमंदिराकडे घेऊन चल. ते २४ तास उघडं असतं असं कळलं. पुन्हा सायकलरिक्षानं फेरी.

नव्यानं पसरलेल्या अमृतसरच्या आत जुन्या अमृतसरची वेस होती. रिक्षावाला म्हणाला, याच्या आतलं ते खरं अमृतसर. असं वाटलं होतं, अमृतसरमध्ये जवळजवळ विनापगडीचं कोणी दिसणारच नाही. पण तसं नव्हतं. सरदार पगडीवाली डोकी व बिनपगडीवाली डोकी जवळजवळ सारख्याच संख्येनं दिसत होती. सुवर्णमंदिराची खडान्खडा माहिती असल्यानं त्यानं आम्हाला मुख्य दारानं न नेता बाजूच्या दारानं नेलं.

जोडे स्टॅण्डवर ठेवले. एरवी उडाणटप्पू



मंडळी बाहेर कचरा करतात आणि आत मात्र शहाण्यासारखी वागतात.

'हरमंदिर साहेब', 'अकाल तख्त', 'गुरुग्रंथसाहेब' अशा शब्दांच्या गोंधळात मन अडकलं होतं. सरोवराच्या चारही बाजूंनी पांढऱ्या स्वच्छ संगमरवरी नक्षीदार कमानी, त्यावर कित्येक ठिकाणी रंगीत खडे-दगड जडवून कलाकुसर केलेली. ताजमहालची आठवण आल्याशिवाय राहवत नव्हतं. मंडळी तेवढ्या कडाक्याच्या थंडीत पांघरूण लपेटून उघड्या कमानीखालच्या दालनात झोपली होती. सरोवराच्या शांत पाण्यात चमचमणाऱ्या सोनेरी सुवर्णमंदिराची प्रतिमाही तेवढीच चमचमत होती. गुरू ग्रंथसाहेब रात्री साडेदहा वाजता मंदिरातून, पालखीतून अकाल तखतकडे रवाना होतात असं आम्हाला सांगितलं होतं.

वाटतील अशी अत्याधुनिक जमान्यातील तरुण मुलं जोड्यांच्या स्टॅण्डचा सांभाळ करत होती. त्यातील एकानं माझे जोडे हातानं उचलले व स्वत:च्या कपाळाला लावले, अगदी भक्तिभावानं! मी अवाक् झाले. काय म्हणावं याला? श्रद्धा? पंढरीच्या वारकऱ्यांच्या दर्शनाला जाऊन, विठोबाच्या पाया पडता आलं नाही म्हणून वारकऱ्यांच्या पाया पडणारे लोक मी पाहिले आहेत. पण इथे तर मी अजून त्यांच्या विठोबाचं दर्शनही घेतलं नव्हतं. पण अहंकार गळून पडलेली व सेवाभावी वृत्तीनं काम करणारी आजची तरुणपिढी बघून खूप आश्वस्त वाटलं.

पांढऱ्या संगमरवरावर अनवाणी पाय थंडीनं थिजत होतं. समोर विस्तीर्ण पसरलेलं पांढरं मंदिर रात्रीच्या अंधारात पांढऱ्या संगमरवरात चमचमत होतं. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी पाण्यात पाय बुडवून, धुऊन पुढे आत गेलो.

रेल्वेच्या भोवती अक्षय कचराकुंडीचं जाळं विणणारी भारतीय मंडळी आत गर्दी करून होती. पण इथे मात्र कचऱ्याचा कणही नव्हता. ही काय मानसिकता आहे? तीच

मंदिरात देवाची मूर्ती नाही तर पवित्र पोथी आहे हे समजल्यावर बरेच प्रश्न मनात उठले होते. कोणत्या भाषेत-कोणत्या लिपीत? आपल्या मंदिरात कसे मुख्य मंदिराच्या आवाराच्या आत अनेक छोटी मंदिरं असतात, म्हणजे शंकराच्या मंदिराच्या आत गणपतीचं, सरस्वतीचं अशी वेगवेगळी मंदिरं असतात, तशी इथेही वेगवेगळी छोटी-मोठी मंदिरं होती. त्या प्रत्येकात एक शीख सरदार-गुरू (ग्रंथी) भल्यामोठ्या पोथीची पानं उलगडताना दिसायचा. लोक त्यांच्यासमोर डोकं टेकवायचे.

सरोवराच्या मध्यभागीचा पुलासारखा भाग सुवर्णमंदिराच्या गाभाऱ्याकडे जात होता. त्यावर भलीमोठी रांग रात्री दहा वाजताही होती. आम्ही रांगेत उभे राहिलो. डोक्यावर कसलंतरी कापड असणं बंधनकारक होतं. तेवढ्यात मंदिराची चांदीची दारं बंद झाली आणि भाविकांच्या गजरात गुरू ग्रंथसाहिबाची पालखी निघाली. फुलांच्या माळांत, रेशमी रंगीबेरंगी वस्त्रांनी सजवलेली. रांगेतील प्रत्येक पुरुष पुढे होऊन पालखीला खांदा द्यायला धडपडत होता. एकेक-दोन मिनिटं खांदा देऊन पुढच्याला संधी द्यायला बाजूला होत होता. ज्यांना तो मान मिळाला ते धन्य धन्य होत होते.

आम्ही लांबून पालखीचं दर्शन घेऊन बाजूला झालो. परतीच्या रांगेला 'कडा प्रसाद' दिला जात होता. तुपात तरंगत असलेला हलवा चवीला छानच लागत होता. रात्रीच्या सुवर्णमंदिराच्या देखाव्याची मजा काही औरच होती. ती नजरेत, कॅमेऱ्यात साठवून आम्ही आमच्या सायकलरिक्षानं हॉटेलकडे परतलो.

रात्रीचे अकरा वाजले होते तरी अनोळखी शहरात सायकलरिक्षानं हळूहळू जातानाही भीती मात्र वाटत नव्हती. गंमत म्हणजे रात्री सुवर्णमंदिराकडे जाण्यासाठी रिक्षा ठरवताना रिक्षावाल्यानं 'किती पैसे' ते सांगितलंच नाही. म्हणत होता, 'आपपे भरोसा है, आप जो देंगे मैं लुंगा।' कदाचित त्यानं दाखवलेल्या या विश्वासामुळे आमच्याही मनात शहराविषयी विश्वास निर्माण झाला असावा.

सकाळी सुवर्णमंदिर पुन्हा बघायचं होतं. अमृतसरचा आलु कुलचा, छोले व लस्सी जगप्रसिद्ध आहे. सकाळी त्याचा नाश्ता करून पुन्हा सुवर्णमंदिराकडे वळलो. तिथल्या सरोवराच्या एका भागात मंडळी डुबकी मारत होती. 'दुखभंजनी' असं त्या जागेला संबोधलं जातं. काठावर बोराचं 'पवित्र झाड' होतं. तिथल्या पाण्यानं रोग बरे होतात असं म्हणतात. माझ्या डॉक्टरी मनाला अशा ठिकाणची अस्वच्छता बघितली की त्यात पाय घालायला नको वाटतं, पण मलाही पाय बुडवावेसे वाटले एवढी स्वच्छता तिथे होती.

दिवसा तिथल्या स्वयंसेवकांची विविध प्रकारची 'सेवा' नजरेत भरत होती. सगळे चांगल्या घरचे लोक मुद्दाम 'सेवा' करायला

आलेले दिसत होते. संगमरवरी फरशीवर ठिकठिकाणी चालण्यासाठी मऊ गालिचासदृश पायघड्या होत्या. त्या साफ करणारी सेवेकरी मंडळी होती. संगमरवरी फरश्या सारख्या साफ केल्या जात होत्या. कोपऱ्यात स्टीलच्या पसरट भांड्यामध्ये प्यायचं पाणी भरून देणारी, ती भांडी विसळून देणारी सेवेकरी मंडळी होती.

सुवर्णमंदिरात 'गुरू ग्रंथसाहिब'च्या दर्शनासाठी गेलो. रात्री पालखीचं दर्शन झालं होतं. पण आता मंदिराचं दर्शन हवं होतं. भलीमोठी न संपणारी रांग होतीच. भाविक 'वाहे गुरू' आणि तत्सम काहीतरी म्हणत होते. आतमध्ये स्वच्छ, सुंदर, रंगीबेरंगी वातावरण होतं. छतालगत वर तशीच छान चादर-गालिचा लावलेला होता. एकंदर इमारतीचं आर्किटेक्चर, कमानींचा आकार, घुमटाचा आकार, छतालगतच्या रंगीत जरीच्या चादरी, संगमरवरातील ताजमहालची आठवण करून देणारं रंगीत नक्षीकाम हे सगळं बघून मुघलांचा किंवा इस्लामचा प्रभाव जाणवल्याशिवाय राहिला नाही.

बऱ्याचदा आपल्या हिंदू मंदिरात गेल्यावर कधी एकदा इथून बाहेर पडतो असं वाटायला लागतं, ते प्रामुख्यानं तिथले पुजारी, भक्तीचे दलाल यांच्या बजबजाटामुळे. एवढे पैसे टाका म्हणजे दर्शन होईल असा विविध प्रकारे दबाव आणून जास्तीत जास्त पैसे कसे उकळता येतील हा हेतू स्पष्ट दिसतो. भक्ती, शांती, जप यांच्या जवळपासचा कुठलाही अनुभव तिथे येत नाही. मेणचट-चिकट भिंती, जमीन, जागोजागी कचरा असा नकोसा अनुभव येतो.

सुवर्णमंदिरात मात्र अगदी वेगळा अनुभव आला. मंदिर सर्व जात-धर्म-पंथ यासाठी खुलं आहे. त्याची चारही दिशांची प्रवेशद्वारं या भावनेचं द्योतक आहेत. भक्तीचे कुठलेही दलाल नाहीत, पैशांचा बाजार नाही. कचऱ्याचा लवलेश नाही. तिथे हजर असलेली सर्व मंडळी लीन, श्रद्धाळू दिसत होती. त्यांच्या भजनाचा, 'वाहे गुरू'चा अखंड जप तिथे होता. कोपऱ्याकोपऱ्यात कीर्तन सुरू होतं.

'सीख' हा शब्द 'शिकणे' या अर्थाचा आहे. शिष्य, शिकणारा तो 'सीख' किंवा 'शीख.' त्यांच्या धर्मात मूर्तिपूजा नाही. निरक्षर शीख माणूस त्यांचा ग्रंथ कसा काय वाचत असेल, की त्याच्या जपानं, श्रवणानं त्याची भक्ती साध्य होते कोण जाणे!

थोडं अस्वस्थ वाटत होतं ते तिथल्या खुलेआम शस्त्र-तलवार-कृपाण यांच्या बाळगण्यानं. नक्षीदार सजवलेल्या मोठमोठ्या म्यानातून तलवारी होत्या. बायकांच्या सलवारीला पण कृपाण होतं.

शीख पंथीयांचे पाच 'K'- पाच 'क' प्रसिद्ध आहेत. **के**श – स्वच्छ, न कापलेले केस, **कं**घा – लाकडी कंगवा, **क**चेरा – एक प्रकारची पांढरी अर्धी चड्डी, **क**डा – हातात घालायचं धातूचं कडं आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी व सच्च्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी **कृ**पाण.

कुणाच्या हातात नुसता चाकू पाहिला तरी आपल्याला असुरक्षित वाटतं. इथे तर प्रत्येकजणच शस्त्रधारी होता. कितीही नाही म्हटलं तरी ऑपरेशन ब्लू स्टारची आठवण डोकं वर काढत होती. चहूबाजूला शस्त्र बघून ती अधिक उफाळून आली. कुठे कुठे लपले असतील अतिरेकी? कसा शस्त्रसाठा लपवून ठेवला असेल? आजच्या स्वच्छ तळ्याचे पाणी तेव्हा कसे रक्तरंजित दिसत असेल? फौजी लोकांचे चहुबाजूंनी आक्रमण. लोंगोवाल-भिंद्रनवाले यांचा काळ. इंदिरा गांधींची हत्या. त्यानंतर उसळलेला शिखांविरुद्धचा हिंसाचार. आमच्या वर्गमित्रानं तेव्हा दाढीमिश्या व डोक्यावरचे केस काढून स्वतःचं 'शीख' असणं लपवलं होतं.

या सगळ्या हिंसक आठवणींच्या पार्श्वभूमीवर आजचं शांत सुवर्णमंदिर अधिकच सुखकर वाटत होतं. सुवर्णमंदिराला भेट देणार म्हटल्यावर माझ्याबरोबर आलेल्या मंडळींच्या हातात अनेकांनी आपल्या इच्छा लिहिलेल्या चिठ्ठ्या दिल्या होत्या. त्या गुरू ग्रंथसाहिबांच्या चरणी अर्पण करायच्या होत्या. त्यासाठी 'अरदास' असा एक परवलीचा शब्द तिथे म्हणायचा असं सांगितलं होतं. आम्ही तसं केलं. काही न बोलता तिथल्या ग्रंथींनी 'वाहे गुरू'च्या गजरात त्या चिठ्ठ्या स्वीकारल्या. श्रद्धेला व भक्तीला कुठलंच लॉजिक लावता येत नाही हे खरं.

तिथल्या लंगरमध्ये आपापली ताटवाटी घेऊन खाली बसून जेवलो. सर्वांना मुक्त प्रवेश असलेलं ते देवळातलं जेवणघर. 'सेवा' करणाऱ्यांचा प्रचंड राबता तिथे होता. सर्वांना रुचेल म्हणून तिथे फक्त शाकाहारी जेवण असतं.

शीख धर्मामध्ये स्त्रियांना समान वागणूक मिळते असं कळून छान वाटलं. स्त्रियांचा व पुरुषांचा आत्मा समान असतो ही त्यातली भावना. स्त्रियांना कीर्तन करण्याचा, ग्रंथी बनण्याचा, लढण्याचा अधिकार पंधराव्या शतकात स्थापन झालेल्या या धर्मात पूर्वीपासूनच दिला आहे. आपल्याला मात्र आजच्या काळातही महिला दिन साजरा करून महिलांच्या समान हक्कांची जाणीव समाजाला करून द्यावी लागते.

सुवर्णमंदिरातून बाहेर पडलो. त्या वातावरणाचा प्रभाव मनावर होताच. बाहेर आमचा केअरटेकर सायकलरिक्षावाला होता. आम्हाला घेऊन जात असताना म्हणाला, 'यहाँ लोग शराब बहोत पिते हैं, इनको जबतक पीके गिर नही पडते – शराब पिये जैसा नहीं लगता।'

आताच तर आम्ही गुरुद्वाराच्या संगमरवरी कमानींच्या, सोनेरी मुलामाच्या आध्यात्मिक आभाळात होतो आणि कमानीपलिकडे आल्यावर मात्र रिक्षावाल्याच्या त्या वाक्यानं लगेच आम्हाला आभाळातून वास्तविक माणसांच्या जमिनीवर आणून सोडलं.


**– डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल,
डेक्कन जिमखाना, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com

# चीनमधील पुस्तके आणि मासिके

अ.पां. देशपांडे

चीनमधील प्रत्येक शहरात केवळ पुस्तकांसाठीचे किमान दोन-दोन मॉल्स आहेत. तर बिजिंग, शांघाय, हंगशाऊसारख्या मोठ्या शहरांत पुस्तकांसाठी अनेक मॉल्स आहेत. या दुकानातील ९९ टक्के पुस्तके चिनी भाषेतील असतात आणि एक भाग परदेशी पुस्तकांचा असतो. पुस्तकांच्या दुकानांना भेट देणे हे दिवसेंदिवस खर्चिक काम होत चालले आहे, कारण पुस्तकांच्या किमती महागड्या असतात. हे मॉल्स बहुमजली असतात आणि त्यामध्ये केलेली पुस्तकांची मांडणी विलक्षण प्रेक्षणीय असते. त्यात जशी मोठ्यांसाठी पुस्तके असतात तशी लहान मुलांसाठी चित्रांची पुस्तके असतात आणि अनेक प्रकारची नियतकालिकेही असतात. मात्र ज्या मॉल्समध्ये मुलांसाठी वेगळे विभाग असतात तेथे त्यांना खेळण्यासाठीही विविध सुविधा असतात, त्यात व्हिडिओ खेळही असतात. मुलांच्या पुस्तकात कॉमिक्स, माणसे व प्राण्यांच्या चित्रांची पुस्तके, ओरिगामी आणि खेळण्यांवरील पुस्तकांची रेलचेल असते. अशा मॉल्समध्ये एखादा विभाग संगीताचा असतो. त्यात संगीताची उपकरणे असतात. सिनेमागृहे असतात. गणित-भाषा आणि हस्तकौशल्य शिकण्यासाठीच्या डीव्हीडी असतात, कार्यालयासाठी लागणारी स्टेशनरीची दुकाने असतात. चीनची पारंपरिक स्टेशनरी विकण्यासाठीची दुकाने असतात, पेंटिंग्ज असतात आणि कॅलिओग्राफीची दुकानेही असतात. पुस्तकांच्या प्रत्येक दुकानात एकेक छोटे कॉफी देणारे हॉटेल असते. तेथे बसून कॉफी पिता पिता गिऱ्हाईकाला पुस्तक विकत घेण्यापूर्वी चाळता येते. चिनी पुस्तकातील बरीचशी पुस्तके पाश्चात्त्य पुस्तकांची चिनीमध्ये केलेल्या भाषांतराची असतात. मात्र

**'सीनास्थान टुडे व्ह्युइंग चायना फ्रॉम इंडिया' या प्रभाकर देवधर लिखित पुस्तकाचे परीक्षण**




अशा पुस्तकांची शीर्षके इंग्रजीत छापलेली असतात. अशा पुस्तकांत दर्जेदार प्राचीन आणि ताजे ग्रंथ असतात, गूढ आणि चित्तथरारक ग्रंथ असतात, प्रेमकथा असतात, 'आपले आपणच शिका' या पद्धतीची पुस्तके असतात, आर्थिक विषयावरची पुस्तके असतात, कॉफी टेबल पुस्तके असतात, प्रवाशांसाठीच्या मार्गदर्शिका असतात, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीची गाइड्स असतात, डिक्शनऱ्या असतात आणि इतर अनेक विषयांवरचे संदर्भग्रंथ असतात.

बिजिंगच्या ताहू भागातील बिजिंग इंटरनॅशनल बुक मॉल हा पुस्तकांसाठीचा जगातला मोठा मॉल समजला जातो. या मॉलमधील दुकाने ५७ हजार चौरस मीटर क्षेत्रफळावर वसलेली आहेत. एवढ्या मोठ्या जागेत ५०० सरकारी दुकाने आहेत आणि ४०० खाजगी मालकीची दुकाने आहेत. कोणाही एका प्रवाशाला ही सगळी दुकाने एकावेळी पालथी घालणे केवळ अशक्य असते. नानशान रस्त्यावरील शेनसेन मॉल, नानजिंग रस्त्यावरील शांघाय बुक मॉल, हंगशूमधील ब्ल्यू लायन बुक कॅफे आणि नानजिंगमधील फोनिक्स बुक मॉल ही आणखी काही प्रसिद्ध दुकाने होत. ताओबाओ किंवा जिंगडॉग मॉलमध्ये पुस्तके स्वस्तात मिळतात. बरेचसे लोक पुस्तकांच्या मॉल्समध्ये आपल्या कुटुंबाबरोबर शनिवार-रविवार भेट देतात. पुस्तकांच्या दुकानात केव्हाही जा, तेथे स्त्री-पुरुष व मुलांची आणि तरुणांची मोठी गर्दी सातत्याने असते.

चीनमधील मुलांना नऊ वर्षे शालेय शिक्षण घेणे सक्तीचे असल्याने ९० टक्के तरी मुले शिक्षण घेतात, तेही मँडरिन या एकमेव चिनी भाषेत. त्यामुळे चीनमधील पुस्तकांना फार मोठे ग्राहक असतात. तो उद्योग विलक्षण फोफावला आहे. आपल्याकडे भारतातही केरळ राज्यात ९७ टक्के लोक साक्षर असल्याने तेथे वर्तमानपत्रांचे वाचक इतर राज्याच्या तुलनेत दहापट आहेत. चीनमधील

छपाईचा दर्जा फार उत्तम आहे. पण भाषांतरीत पुस्तकांवर इंग्रजी शीर्षके का याचे कोडे अनेकांना पडते. २०१० सालापर्यंत गुगलवर चीनच्या पुस्तक प्रकाशन धंद्याबद्दल फारशी माहिती मिळत नसे, पण २०१० सालामध्ये चीनने प्रथमच प्रकाशन व्यवसायाची माहिती गुगलवर उपलब्ध करून दिली. जनरल ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ प्रेस अँड पब्लिकेशनने दिलेल्या या माहितीत चीनने २०१० साली ३,२८,००० पुस्तके आणि ९८८४ नियतकालिके प्रसिद्ध केल्याचे म्हटले आहे. २००९ सालापेक्षा ही आकडेवारी पुस्तकाबाबत १.४ टक्क्याने आणि नियतकालिकांत २ टक्क्यांनी जास्त आहे. चीनने २०१०मध्ये ९,६५,००० शीर्षकांची पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, दृकश्राव्य पुस्तके व इलेक्ट्रॉनिक पुस्तके (प्रती नव्हेत) परदेशी निर्यात केली. ही आकडेवारी २००९च्या तुलनेत ४.९ टक्क्यांनी जास्त आहे. चीनचा प्रकाशन व्यवसाय २०१० मध्ये १९ टक्क्यांनी वाढला. प्रकाशन व्यवसायात २०१० साली चीनमध्ये १० लाख कोटी रुपयांचा व्यवहार झाला. तो २००९च्या तुलनेत १३ टक्क्यांनी जास्त होता. आता अंकीय (डिजिटल) प्रकाशनाचा काळ आहे. चीनमध्ये २०१० साली हा व्यवहार मागच्या वर्षापेक्षा ३१ टक्क्यांनी वाढला.

प्रकाशन व्यवसायातून चीनची संस्कृती जगभर पसरावी हा चीनचा प्रयत्न असतो, पण अजून त्यांना त्या बाबतीत समाधानकारक यश मिळालेले नाही. चीनमधील प्रकाशन संस्था दरवर्षी १५ टक्क्यांनी वाढत आहेत. पूर्वीच्या बऱ्याचशा सरकारी प्रकाशन संस्थांचे आता खाजगी संस्थांत रूपांतर होत आहे. चीनमध्ये राजकीय नसलेली जी जी वर्तमानपत्रे व नियतकालिके आहेत त्यांची पुनर्रचना सरकारी खात्यातर्फे केली जात आहे. २०१० साली चीनमध्ये वेगवेगळी १९०० वर्तमानपत्रे प्रसिद्ध होत होती. त्यातील २३ वर्तमानपत्रांचा खप प्रत्येकी १०-१० लाखांपेक्षा अधिक आहे. त्यात रेफरन्स न्यूज, पीपल्स डेली, गुनांगशाऊ डेली, ग्लोबल टाइम्स अशी काही आहेत. मात्र या वर्तमानपत्रांवर चीनमधील कम्युनिस्ट पक्षाचा पगडा आहे. चीनमधील प्रकाशन व्यवसायाची आणखी काही आकडेवारी मजेशीर आहे. येथे प्रत्येक १० लाख लोकांमागे २४५ शीर्षकांची पुस्तके छापली जातात आणि प्रत्येकी हजार लोकांमागे वर्तमानपत्रांच्या ९२.५ प्रती छापल्या जातात.

चीनमध्ये लोक इंटरनेट वापरून पुस्तके इतक्या प्रमाणात खरेदी करतात की आता पुस्तके विकणारी दुकाने हळूहळू बंद पडू लागली आहेत. यातून टिकून राहण्यासाठी आता दुकानदार मोठमोठ्या सवलती देऊ लागले आहेत. दुकानदार १२ टक्के सवलत देत असतात तर इंटरनेटवरून विकल्या जाणाऱ्या पुस्तकांवर ५० ते ६० टक्के सवलत मिळतेच, शिवाय पुस्तके मोफत घरपोच मिळतात. यात चीनमधील जिंगडॉनमॉल, डँगडुन आणि ॲमेझॉन चायना ह्या इंटरनेट साइट्स आहेत. या आव्हानापुढे दुकानदार टिकून राहणे अवघड दिसते, कारण ही इंटरनेट दुकाने २४ तास उघडी असतात तर दुकानांना किती वेळ दुकाने उघडी ठेवायची यावर बरीच सरकारी बंधने असतात. सध्या इंटरनेटमार्फत होणारी विक्री एकूण पुस्तक विक्रीच्या ३० टक्के असून डँगडुन या इंटरनेट कंपनीच्या प्रमुखपदी असलेल्या ली गुकिंग यांच्या म्हणण्याप्रमाणे २०१३च्या अखेरीपर्यंत ती ५० टक्क्यांपर्यंत जाईल. याचा थेट परिणाम देशातली ७० टक्के दुकाने बंद होण्यावर होईल असा त्यांचा अंदाज आहे. गेल्या चार वर्षांतच १० हजार दुकाने बंद पडली आहेत. चाओ झांगाऊ हे पेपर टायगर कल्चरल ग्रूपचे अध्यक्ष आहेत. चीनमधील जागांच्या किमती प्रचंड प्रमाणात वाढत आहेत. पुस्तकांची खाजगी दुकाने बंद होण्यामागे या वाढत्या किमती हेही महत्त्वाचे कारण आहे. बिजिंगमध्ये 'बुकवर्म' हा पुस्तकाचा एक मोठा मॉल आहे. लोनली पॅनेल नावाच्या संस्थेने पुस्तकांचा हा मॉल जगातल्या १० मोठ्या मॉलपैकी असल्याचे २०१० साली म्हटले होते. या मॉललाही तोट्याची प्रचंड झळ बसत असून त्यातून कसे बाहेर पडायचे याचा प्रश्न पडला आहे. 'ओ टू सन' नावाचे चीनमधील पुस्तकांचे एक साखळी दुकान. यांची देशभरात ३१ दुकाने होती व ती २४ तास चालू राहणारी होती. त्यांनाही बिजिंगमधील दुकानांची भाडी परवडत नाहीत. चीनमध्ये पुस्तकांच्या दुकानांना ८ टक्के व्यवसाय कर आणि ३३ टक्के आयकर द्यावा लागतो. तेथे हॉटेल आणि पुस्तकाचे दुकान यांच्या करआकारणीत काही फरक नाही. पण सरकारी दुकानांना मात्र कोणताही कर भरावा लागत नाही असे चाओ सांगतात. पुस्तकाच्या दुकानांची ही समस्या तेथील वर्तमानपत्रे आणि टेलिव्हिजनच्या वाहिन्या यांच्या चर्चेचा मोठा विषय असतो. मात्र ज्या मॉलमध्ये पुस्तक विक्रीबरोबर इतर अनेक गोष्टीही विकल्या जातात त्यांच्यावर ही कुऱ्हाड पडणार नाही.

चीनमध्ये सध्या पुस्तक छपाईच्या ५६८ प्रकाशन संस्था असून दृकश्राव्य पुस्तकांच्या २९२ संस्था आहेत. सरकारी स्तरावरही पुस्तक प्रकाशनांच्या संस्था स्थापन केल्या जात असून पुस्तक छपाईच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारतर्फे पारितोषिके देण्याच्या योजनाही येऊ घातल्या आहेत. चीनमध्ये १९४९ साली २५७ नियतकालिके होती व या सर्व नियतकालिकांच्या मिळून २ कोटी प्रती निघत. या प्रतींची संख्या प्रत्येक माणसामागे ०.१ एवढी होती. १९७९ मध्ये राज्यकारभारात पुनर्रचना झाल्यावर नियतकालिकांची संख्या १४७० झाली आणि प्रतींची संख्या १२० कोटी झाली. हे प्रमाण प्रती माणशी १ एवढे झाले. नंतर २००४ मध्ये ८००० नियतकालिके निघू लागली आणि प्रतींची संख्या २७० कोटी झाली. हा आकडा प्रती माणशी २.१ झाला आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा प्रभाव वाढत गेल्याने आता देशात २००० इलेक्ट्रॉनिक प्रकाशने दरवर्षी होतात. चीनच्या सरकारने पुस्तके वाचण्याची एक धडक मोहीम संपूर्ण देशभरात राबवली असून त्यामुळे शहरातून पुस्तक खरेदी वाढली आहे. चीनच्या ग्रामीण

भागातील दुकानांवरचे कर काढून टाकण्याची एक योजना सरकारपुढे असून त्यामुळे चीनच्या अविकसित भागात पुस्तकाची दुकाने उघडण्याची मोहीम सुरू होऊ शकेल. शिक्षणावरच्या अंदाजपत्रकात केलेल्या वाढीमुळे पुस्तक विक्री वाढली आहे. २००९ मध्ये शिक्षणाचे अंदाजपत्रक ९११ कोटी रुपयांचे होते. ही तरतूद २००७ सालापेक्षा ६० टक्क्यांनी जास्त होती. २००४ साली चीनमध्ये पदवीधरांची संख्या २८ लाख होती, आता ती ४६ लाख झाली आहे. चीनमध्ये मुले चौथ्या वर्षी केजीत जातात. प्राथमिक शिक्षण सहाव्या वर्षी सुरू होते. १९८५ सालापासून चीनमध्ये ९ वर्षांचे शालेय शिक्षण सक्तीचे आहे. पण तरीही अगदी अलिकडच्या एका बातमीप्रमाणे चीनमध्ये कमी संख्येने लोक पुस्तके वाचत असल्याने त्यांची वाचन प्रगती कमी आहे. म्हणून पुस्तक विक्री वाढवण्याचा एक कार्यक्रम सरकारी स्तरावर घेतला गेला आहे. १९९० साली चीनमधील प्रत्येक माणूस दरवर्षी ५.२ पुस्तके वाचत असे ते प्रमाण २००९ साली वाढून वाढूनही फक्त ५.६ पर्यंत गेले. पण पुस्तकांच्या रूपाने जेवढी पाने छापली जातात त्यात १९९९ ते २००९ या दहा वर्षांत ४५ टक्क्यांनी वाढ झाली. पण ह्या वाढीचा संबंध सकल राष्ट्रीय उत्पन्नाशी किंवा प्रत्येक माणसाच्या उत्पन्नाशी लावला तर तो कमी भरतो. खरे म्हणजे सांस्कृतिक गोष्टींवरचा लोकांचा खर्च दरवर्षी १० टक्क्यांनी वाढत असला तरी त्यातला फारच कमी पुस्तक खरेदीवर होताना दिसतो. नियोजनबद्ध आर्थिक विकासाच्या या काळात पुस्तक खरेदी कमी होत आहे ती या विकासाशी सुसंबद्धच आहेत. बऱ्याच वाचकांच्या मते पुस्तकांच्या किमती जास्त आहेत. प्रत्येकाचे वार्षिक उत्पन्न पाहिले तर ते त्यामानाने खूप प्रमाणात वाढत आहे, पण लोक चिनी पुस्तके काही खरेदी करत नाहीत. ते परदेशीयांची पुस्तके खरेदी करत असतात. पुस्तकांच्या किमती कमी केल्या तर पुस्तकांची छपाई कमी दर्जाची तर होईलच, शिवाय पुस्तकलिखाणावर जगणाऱ्या लेखकांना त्यातून पुरेसे पैसे मिळणार नाहीत. चीनमधील डिक्शनरीच प्रकल्प महागडे असतात आणि जर त्यांची विक्री पुरेशी होणार नसेल तर ते प्रकल्प बंद करावे लागतील.

चीनच्या शहरी भागात जेवढी पुस्तक विक्री होते, त्या तुलनेत ती ग्रामीण भागात फक्त १८ टक्के होते. कारण ग्रामीण भागात राहणारे शेतकरी कमी शिकलेले आहेत आणि तेथे पुस्तक विक्रीसाठी पुरेसे प्रयत्न होत नाहीत. येथून इंटरनेटद्वारा होणारी विक्रीही मर्यादित आहे कारण पुस्तकाच्या किमतीपेक्षा पुस्तके घरी पोचवण्याचा खर्च जास्त येतो. यासाठी दुकानदारांना सरकारने करमाफी दिली तर ग्रामीण भागात विक्री वाढू शकेल. ग्रामीण भागातले लोक नवनवीन जीवनशैली वापरत नसल्याने त्यांची वाचनसंस्कृती वाढत नाही असेही एक निरीक्षण आहे.

पुढील काळात चीनचे महत्त्व वाढत जाणार असल्याने भारतातील मुले जसे फ्रेंच आणि जर्मन भाषा शिकतात तशी त्यांनी चीनची मँडरिन भाषाही शिकली पाहिजे, कारण पुढील पिढीवर चीनचा प्रभाव पडणार आहे. आज मुले जशी अमेरिकेत जातात तशी पुढच्या पिढीची मुले चीनमध्ये जातील, तेव्हा त्यांना मँडरिन भाषा शिकल्याचा फायदा मिळेल.

'सीनास्थान टुडे व्ह्युइंग चायना फ्रॉम इंडिया,'
लेखक – प्रभाकर देवधर,
मॅक ग्रो हिल प्रकाशन, मूल्य २९५ रुपये

**– अ.पां. देशपांडे**
बी–५, जलाराम ज्योत, वल्लभबाग लेन,
घाटकोपर (पू), मुंबई–४०००७७
भ्रमणध्वनी : ९३२२२४७०७४
apd1942@gmail.com





**माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
**नारायण विष्णू आठवले**

**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

नारायण विष्णू आठवले यांनी सांगितलेल्या या कटाची पार्श्वभूमी, घातपाती कृत्ये, अटक, न्यायालयीन पातळीवरील संघर्ष आणि वेगवेगळ्या तुरुंगांतील बंदिवास यांची आणि जीवनाची साद्यंत कहाणी...

**माझं साहित्यिक खटलं**
**ॲड. यशवंत हडप**




**मूळ किंमत २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

वडील वि.वा. हडप यांच्या साहित्यातील योगदानामुळे प्रसिद्ध लेखकांची घरी ऊठबस असे. त्यातूनच यशवंत हडप यांचा बऱ्याच लेखकांशी स्नेह जुळला. त्यांच्या आयुष्याशी समरस होत लिहिलेले हे लेख. मनोरंजक व उद्बोधक माहिती देणारे...

## ‘लॉक ग्रिफिन’ कादंबरीसाठी वसंत वसंत लिमये यांना ‘सहकारमहर्षी साहित्य पुरस्कार’!



‘सरकारमहर्षी साहित्य पुरस्कारा’चे वितरण मंगळवारी सायंकाळी सोलापुरात झाले. त्यावेळी (डावीकडून) विजयसिंह मोहिते-पाटील, डॉ. यू. म. पठाण, योगिराज वाघमारे, वसंत लिमये, राजा माने, संतोष शिंत्रे आणि रामचंद्र म्हस्के




*‘वेगळा विदर्भ’ पुस्तक प्रकाशनासमयी* – डावीकडून मृणाल नानिवडेकर, नितीन केळकर, अध्यक्ष गोविंदराव पानसरे, प्रकाश आंबेडकर, देवदास मटाले, लेखक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि विजयकुमार बांदल

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, ‘शब्द रुची’ हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.